KARWAN E MOHABBAT

# प्रेमाची वारी

कारवान ए मोहब्बत

کاروانِ محبت

**2017**

# प्रेमाची वारी

## अनुक्रमणिका


प्रेमाची वारी ........ 2

प्रस्तावना ........ 3

दिवस १ ला ........ 5

दिवस २ रा ........ 5

दिवस ३ रा ........ 6

दिवस ४ था ........ 8

दिवस ५ वा ........ 10

दिवस ६ वा ........ 12

दिवस ७ वा ........ 14

दिवस ८वा ........ 15

दिवस ९ वा ........ 17

दिवस १०वा ........ 19

दिवस ११वा ........ 21

दिवस १२ वा ........ 23

दिवस १३ वा ........ 25

दिवस १४ वा ........ **Error! Bookmark not defined.**

दिवस १५ वा ........ **Error! Bookmark not defined.**

दिवस १६ वा ........ 32

वारी चालूच राहील ........ 34

## प्रस्तावना

द्वेषातून केल्या जाणाऱ्या हिंसेच्या भयग्रस्त वातावरणात जीवन जगणाऱ्या देशभरातील अनेक भागांमधील लोकांना अनेक व्यक्ती, संघटना आणि सामाजिक चळवळींच्या सहभागातून बनलेल्या ह्या प्रेमाच्या वारीने भेट दिली. ह्या अन्यायग्रस्त लोकांवर केल्या गेलेल्या अन्यायाचे प्रायश्चित्त घेण्यासाठीही वारी निघाली होती.त्यांच्या जखमांवर फुंकर मारण्यासाठी आणि त्यांच्या न्यायाच्या लढ्यामध्ये त्यांच्या बरोबरीने आम्हीही सामील आहोत हे सांगण्यासाठी ही प्रेमाची वारी होती. बहुसंख्याकांच्या सद्सदविवेकबुद्धीलाजागवण्यासाठी देखील ही प्रेमाची वारी निघाली होती.

या प्रेमाच्या वारीचा प्रवास ह्या अन्याय झालेल्या अनेक ठिकाणी केला गेला. हा प्रवास एक धाडसी पण अल्पसा प्रयत्न होता. ह्या प्रेमाच्या वारीचा उद्देश सहानुभुती दाखवण्याचा होता. द्वेषाच्या झंझावातात एक आशेचा किरण एवढाच प्रयत्न होता..

जमावाने हल्ला करून ठार मारण्याच्या जास्तीत जास्त विदारक अशा घटना ज्या ठिकाणी झाल्या होत्या त्या भागात या प्रेमाच्या वारीने प्रवास केला. ह्या प्रेमाच्या वारीची ह्या प्रदेशात जाण्यामागेदोन उद्दिष्ट्ये होती. एक म्हणजे दैनंदिन आयुष्यातील मुस्लिम, दलित आणि ख्रिश्चन समूहांना वाटणारे सततचे भय, आणि बहुसंख्य लोकांनी ह्या घटनांबद्दल दाखवलेली अनास्था आणि चुप्पी तोडणे.आज दाटून येणाऱ्या निराशेच्या अंधारात आमच्या मुस्लिम, दलित आणि ख्रिश्चन भावा-बहिणींच्या सोबत आम्ही आहोत हे जाहीरपणे त्यांना सांगायचे होते. शिवाय ह्या प्रेमाच्या वारीच्या प्रवासानेआम्ही बहुसंख्यांकांच्या सद्सदविवेकबुद्धीला आवाहन देखील करत होतो.

मोठ्या संख्येने नागरी समाजाच्या सहभागाने झालेल्या ह्या प्रेमाच्या वारीने जमावाने चाल करून ठार केलेल्यांच्या,दलितांवर झालेल्या हल्ल्यात मारल्या गेलेल्या,पोलिसांनी जाणूनबुजून केलेल्या हल्ल्यात मारल्या गेलेल्यातसेच चेटुक करणारी म्हणून मारल्या गेलेल्या स्त्रियांच्या कुटुंबियांच्या भेटी घेतल्या.

हा प्रवास 4 सप्टेंबर 2017 रोजी आसामपासून सुरू झाला. आधी झारखंड व कर्नाटकात जाऊन आल्यावर 11 सप्टेंबर पासून दिल्लीत टिळक विहारयेथूनया वारीचा दुसरा टप्पा सुरु झाला. दुसऱ्या टप्प्यात वारीचा प्रवास एकत्र बस मधून केला गेला. दिल्लीहून निघून वारीपश्चिम उत्तर प्रदेश, हरियाणा, राजस्थान करत अखेर गुजराथ मध्ये संपन्न झाली.

या वारीच्या दोन टप्प्यांतील एकत्रित केलेला दैनंदिन अहवाल येथेदिला आहे. प्रेमाच्या वारीत सहभागी झालेले सारेजण प्रत्येक राज्यात हिंसक द्वेषात बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांना भेटले. त्यांनी प्रत्येक कुटुंबाचे सांत्वन केले व त्यांच्या दुखा:त सहभागी असल्याचे सांगितले. प्रत्येक कुटुंबाने हा धक्का कशा रीतीने सोसला आहे, त्यांच्या जीवनावश्यक, मानसिक व सामाजिक आणि न्याय मिळवण्याच्या प्रक्रियेसाठीच्या गरजा काय आहेत, त्यांना काय मदत हवी आहे ह्या सर्वांचा अंदाज बांधायचा प्रयत्न केला. ह्या भेटीनंतर प्रेम व एकतेचा संदेश देणाऱ्या जाहीर `अमन सभा' घेतल्या.त्यातून हत्या झालेल्यांच्या कुटुंबियांच्या न्यायासाठीच्या लढ्यात सहकार्य करतील, त्यांचे जीवनाधाराचे प्रश्न सोडवायला मदत करतील आणि एकंदर समाजात शांती, सद्भावना आणि एकोपा वाढावा यासाठी प्रतिबद्ध असणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या `अमन इंसानियत नागरिक समिती'ची स्थापना करण्याचा प्रयत्न प्रेमाच्या वारीने केला.

हा प्रवास गांधींच्या अखेरच्या महिन्यांच्या स्मृतींना विनम्र होऊन केलेले एक अभिवादन आहे. हिंदू-मुस्लिम दंगलींमध्ये दहा लाख लोक मरण पावले होते .संपूर्ण देशांला घृणेने व द्वेषाने घेरले होते व खिळखिळे केले होते. तरीही ते प्रेम आणि शांतीसाठी नौखालीत धैर्यानेएकटेच पायी फिरले होते. म्हणूनच 2 ऑक्टोबर रोजी गांधीच्याजन्मस्थानी ह्या `प्रेमाच्या वारी'चा शेवटचा मुक्काम होता. संपूर्ण देशभर घृणा व द्वेषाचे वातावरण असताना देखील त्यांच्या हिंदू-मुस्लीम ऐक्यावरच्या आजीवन विश्वासाने गांधींनी केलेल्या प्रेम आणि एकतेच्या आवाहनाचे स्मरण करण्यासाठी हा दिवस योजला आहे. आमची हाक आहे, आमचे आवाहन आहे `चलो पोरबंदर' `हम सब गांधी'.

भारताच्या संविधान लेखनाचे नेतृत्व करण्याऱ्या डॉ. आंबेडकरांना ही वारी अभिवादन करत आहे. लोकशाहीचे आणि आपल्या घटनेचे मर्म हे बंधुत्वामध्ये आहे ह्या त्यांनी दिलेल्या सावधानतेच्या इशाऱ्याचे स्मरण करून ही वारी निघाली आहे. आज आपल्या देशात ह्या बंधुत्वाच्या मर्मावरच वारंवार आघात होत आहेत.

ह्या प्रेमाच्या वारीने काही मिळवले का? ह्या वारीच्या दीर्घ प्रवासात त्या वारीचे प्रवासी आणि सहप्रवासी कोरडे राहिलेले नाहीत. त्यांच्या अंतर्मनाला हेलावून टाकणाऱ्याज्या गोष्टी त्यांनी ऐकल्या त्या कायमच्या त्यांच्या मनात घर करून बसल्या आहेत.

एक गोष्ट ह्या वारकऱ्यांच्या नक्की हाती आली आहे ती म्हणजे ह्या प्रवासात  पराकोटीचा  द्वेष आणि प्रचंड शासकीय अन्याय एकाकीपणे सोसत असलेल्या भारतातील पन्नासपेक्षा जास्त कुटुंबातील सदस्यांना मोलाचा दिलासा मिळाला आहे. ह्या एका गोष्टीनेही या प्रेमाच्या वारीचे सार्थक झाले आहे.

पहलू खानला ज्या ठिकाणी जमावाने जीवे मारले होते त्या ठिकाणी फुले वाहण्यास विरोध करणाऱ्या संतप्त जमावाने `प्रेमाच्या वारी'तील कार्यकर्त्यावर दगडफेक केली तेव्हा अनेक ठिकाणी बहुसंख्याकांच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन करण्याकरिता अधिक प्रभावी असण्याची गरज होती असे आम्हाला जाणवले. दलित आणि अल्पसंख्याकांविरुद्धच्या द्वेषाबद्दल व त्यातून केलेल्या हिंसे बद्दल, अनेक स्थानिक क्षेत्रातील बहुसंख्यांक समुदायांमध्ये पश्चात्तापाचा अभाव आढळून आला.

वारीला नवा धीरही मिळाला कारण केवळ दगड आणि पादत्राणेचत्यांच्यावर फेकली गेली नाहीत तर अनेक ठिकाणी सामान्य लोकांनी गुलाब पाकळ्यांचा वर्षावही केला आणि ह्या `प्रेमाच्या वारी'त ते सामील देखील झाले. `प्रेमाच्या वारी'चे आर्थिक मदतीसाठी केलेले आवाहन देखील लोकांनी उचलून धरले आणि जमाव-निधी (क्राऊड फंडिंग) पद्धतीने निधी गोळा केला गेला वह्या जमलेल्या निधीतूनच ही वारी पूर्ण झाली. वारीचा सर्वच खर्च ह्या निधीतून झाला. एका अर्थाने मदत करणारे सारेही सहप्रवासी म्हणून ह्या वारीत सामील झाले.प्रेमाच्या वारीचेअपरात्री झालेले आगमन वा अवेळी प्रवास ह्यांना न जुमानता मोठ्या संख्येने शांतता सभांसाठीव वारीच्या स्वागतासाठी लोक जमले.

सर्वसामान्यांच्या सद्सद-विवेकबुद्धीला आवाहन करायचे वारीचे उद्दिष्ट होते आणि ते पूर्ण करण्याच्या कामाला बऱ्याच वारकऱ्यांनी सुरवात केलीच आहे. त्यांनी पाहिलेल्या आणि ऐकलेल्या गोष्टी फोटो, व्हीडिओ आणि शब्दांद्वारे सांगायला त्यांनी सुरवात केली आहे व हे प्रसाराचे काम करत रहायचा निर्धार त्यांनी केला आहे. भीती, द्वेष आणि अन्याय,जबरदस्ती अशा वास्तवात लोकांना कसे जगावे

लागत आहे याची जाणीव करून देऊन ह्या वास्तवापासून दूर असलेल्या भारतीयांच्यासद्सद्विवेक बुद्धीला आवाहन करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे.

## दिवस १ ला

आम्ही आसाममधील प्रेमाच्या वारीचा पहिला दिवस आज पूर्ण केला आहे. नायगावमध्ये मारझोड करून ठार केलेल्या रियाज आणि अबू हनीफ या दोन भावांच्या कुटुंबियांनाआम्ही भेटलो. ही भेट हृदयद्रावक होती. ते दोघेही पौगंडावस्थेतील तरुण जवळच्या बिगर मुस्लिम गावात मासेमारी करत होते.अशीअफवा पसरलेली होती की ते दोघे गाय चोर आहेत, म्हणून एका जमावाने त्यांना मारहाण करून जीवे मारले होते. त्याशिवाय त्यांची मृत शरीरे देखील छिन्न विच्छिन्न केली होती. त्यांचे आईवडील अजूनही त्या दु:खातून सावरलेले नाहीत. कारण त्यांच्या दोन्ही मोठ्या मुलांना अत्यंत अमानुष व क्रूरपणे मारणारे त्यांचे शेजारीच होते. आम्ही आशा करतो की आमच्या भेटीमुळे त्यांना थोडासा दिलासा मिळाला असेल. या प्रकरणी दहा पुरुषांना अटक करण्यात आली आणि त्यांना ताबडतोब जामिनावर सोडण्यात आले. स्थानिक वकिलांचा एक गट त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करायला तयार झाला आहे.

आम्ही नागांव जिल्ह्यात  पहिल्या `अमन इंसानियत नागरिक परिषदे'ची स्थापना करू शकलो. आम्ही आशा करतो की सामूहिकपणे नागरी समाज प्रत्येक जिल्ह्यात ही परिषद तयार करेल. अल्पसंख्यांक, दलित, आदिवासी आणि महिलांविरोधीद्वेष आणि होणाऱ्या अमानुष हिंसेविरुध्द ही परिषद लढेल. दुपारी गोहत्तीतील विद्यार्थी नेते बोलले. त्यांनी द्वेष व शोषण विरहीत नूतन भारताची संकल्पना सादर केली.

## दिवस २ रा

वारीचा दुसरा दिवस अजून मावळला पण नव्हता तोच आम्हाला अत्यंत धक्का देणारी गौरी लंकेशच्या खुनाची बातमी कळली. गौरी लंकेश एक शूर, निर्भय आणि कोणचीही तडजोड न करता हिंदुत्वविरोधाची लढाई लढणारी लढवय्यी होती. तिच्या खुनाने आम्ही सुन्न झालो होतो. पुन्हा एकदा असहिष्णुता आणि अविचारी, अविवेकी शक्तींनी भ्याडपणे, आपल्यातील एक विचारी आणि विवेकी आवाज कायमचा मारला आहे.पण तिच्या मरणानंतर ती नसली तरी तिचा आवाज अधिकच दमदारपणे आपल्या बरोबर असेल.

`वारी प्रेमाची' चा दुसरा दिवस देखील शोकाकुल आईवडिलांच्या भेटीचा होता. परंतु त्यांच्या मुलांना जमावाने नाही तर द्वेषाच्या इतर शक्तींकडून मरण पत्करावे लागले होते. आम्ही प्रथम गोलपारा जिल्ह्यातील खारबुजा गावात 22 वर्षाच्या याकुब अलीच्या आईवडिलांना भेटलो. या आणि आसामच्या इतर जिल्ह्यांमध्ये, मोठ्या संख्येने मतदारांना ते 'संशयास्पद मतदार' असल्याची सूचना देण्यात आली

आहे. आई-वडिलांना भारतीय नागरिक मानलेले असले तरी मुले 'संशयास्पद'मतदार ठरू शकतात आणि हे काही नवे नाही. याकुब यांनी 30 जून 2017 रोजी भारतातील बंगाली मुस्लिम नागरिकांच्या विरोधात सरकार करत असलेल्या ह्या कारवाईच्या विरोधात निदर्शने केली. ह्याचे विडीयो चित्रीकरण उपलब्ध आहे. निदर्शकांनीसौम्य अशीदगडफेक केली होती. एका पोलिसाने राइफल उचलून, नेम धरला व याकुब ठार झाला. त्या दगडफेक करणाऱ्याजमावाला प्रतिरोध करण्यासाठी सौम्य पवित्रा न घेता,पोलिसांनी आगाऊ इशारा न देता, नियमाप्रमाणे कंबरे खाली शूटिंग न करता . सरळ सरळ ठार मारण्यासाठी गोळी चालवली गेली.

कोकराझार जिल्ह्यातील सलाकाती मसजिद पारा गावात आम्ही लताकुमल इस्लाम अहमदच्या दु:खीआईवडीलांना भेटलो. लताकुमल इस्लाम अहमद एबीएमयूयू (ऑल बोडो टेरिटोरियल कौन्सिल मायनॉरिटी स्टुडंट्स युनियन) चे लोकप्रिय राज्य अध्यक्ष होते. त्यांनी बोडोलँडमधील विविध समुदायांमध्ये एकोपा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या मातृभूमीचा द्वेषाच्या आणि हिंसाचाराच्या लांबलचक इतिहासाला बदलायचा प्रयत्न केला. त्यांच्या धर्मनिरपेक्ष, समावेशक आणि सुधारणा-आधारित प्रगतीशील राजकारणाने ते सर्व समुदायांमध्येअतिशय लोकप्रिय होते. अर्थातच तेथील प्रचलितद्वेष आणि दुफळीचे त्यामुळे धोक्यात आले. 1 ऑगस्ट 2017 रोजी एका गजबजलेल्या बाजारपेठेत भर दिवसा दोन सशस्त्र बंदूक धारकांनी डझनभर बुलेट्स त्यांच्यावर झाडल्या. त्यांच्या दफनविधीसाठी सर्व जमातीचे हजारो लोक एकत्र आले. पण त्यांचे मुख्य मारेकरी अद्याप सापडलेले नाहीत.

वारीने आसाम सोडले ते हे मोठे दु:ख सोबत घेऊनच. राज्यातील द्वेष, हिंसा आणि उघडपणे शत्रुत्वाने वागणारे शासन यांमुळे आसाममधील अल्पसंख्यकांना पूर्वीपेक्षाही अधिक भयाने आणि कधीही काहीही होऊ शकेल ह्या भीतीने ग्रासले आहे.समानता, आणि धर्मनिपेक्षता या संविधानाच्या मूल्यांना बांधील असणाऱ्या सर्व भारतीयांनीत्यांच्यामागे ठामपणेउभे रहायला हवे..

## दिवस ३ रा

झारखंडच्या गिरिडीह ते रामगढहून धक्के खात जाणाऱ्या बसच्या प्रवासात आजच्या दिवसाच्या घडामोडीची थोडक्यात नोंद करत आहे.आज ह्या वारीचा तिसरा दिवस:

या प्रेमाच्या वारीची गरज किती आहे हे जाणवून देणाऱ्या अनेक गोष्टींनी माझे हृदय जड झाले आहे.

निर्भय, करिष्मामय, प्रभावशाली आणि धार्मिक द्वेष आणि संकुचित विचारांविरुद्ध विना-तडजोड लढणाऱ्या गौरी लंकेश यांच्य भ्याड हल्ल्यात झालेल्या खुनाची छाया वारीवर पडलेलीच होती.द्वेष, धमकी आणि भीतीच्या या वातावरणाचा रोख फक्त अल्पसंख्यांक आणि दलित यांच्या विरोधात नाही तर त्यांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आणि घटनात्मक मूल्यांसाठी लढा देणाऱ्यां विरुद्धही आहे याबद्दलचा हा जमिनीवर आणणारा थेट इशारा होता. .

आम्ही गिरिडीह येथील एका गावात गेलो, आणि आम्हाला अख्लाकच्या गोष्टीची पुनरावृत्ती झालेली आढळली. नुसत्या त्या घटनेचीच नव्हे तर गावकऱ्यांनी त्याच्या हत्येचे जे जमातवादी समर्थन दिले त्याचीही. ज्या म्हाताऱ्यावर जमावाने हल्ला केला होता - उस्मान अंसारी - तो कसाबसा हल्ल्यातून वाचला पण मनाने आणि शरीराने पूर्ण खचून गेलेला आहे. हल्ल्यांना अनेक महिने झाले असले तरी तो अजून लपून राहिलेला आहे.

28 जुलै, 2017 रोजी घडलेल्या या कथेमध्ये दादरीचे अनेक प्रतिध्वनी आहेत. संपूर्ण हिंदु वस्तीमध्ये एकच मुस्लिम घर. गावाच्या कचरा जमा करण्याच्याजागेत एक मुंडके कापलेली गाय रहस्यमय रीतीने आढळल्यावर त्याने गाय मारली अशी अफवा पसरणे. त्याच्या घरात त्याच्या शेजाऱ्यांनीच त्याच्यावर केलेला क्रूर हल्ला, त्याला बेशुद्ध होईपर्यंत मारणे. त्याला मेलेला म्हणून सोडून देणे, त्याचे घर पेटवून बेचिराख करणे. त्याच्या शरीराला ते आग लावण्याच्या बेतातच असताना पोलीस आणि डिसी आल्याने काही सेकंदाने त्याचा जीव वाचणे.

या काळ्याकुट्ट ढगाला एकच सोनेरी कड होती. ती म्हणजे तिथल्या डीसीने आणि त्याच्या निर्देशनात पोलीसांनी बजावलेली प्रशंसनीय आणि अनुकरणीय भूमिका. जमाव त्यांच्यावर आणि त्यांच्या मोटारींवर दगड्फेक करतो. पण ते त्या म्हाताऱ्या माणसाला वाचवतात आणि त्वरित हजारीबाग हॉस्पिटलात घेऊन जातात.तो आठ दिवस बेशुद्ध असतो आणि रांची हॉस्पिटलमध्ये दोन महिने उपचार चालतात. त्यच्या डोक्याची जखम अजूनही वाहते, त्याच्या हाताच्या हाडांचे तुकडे तुकडे झालेले आहेत.

परंतु त्याच्या गावातील कोणीही त्याच्या हत्येदरम्यान त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला  नाही आणि तेव्हापासून कोणीही त्याच्याशी संपर्क ही नाही. राज्य प्रशासनानेही आर्थिक मदत दिलेली नाही. म्हातारा आमच्याशी बोलला तेव्हा तो अनेकवेळा रडला. त्याचा मुलगा वैद्यकीय खर्चाची मदत मिळवण्यासाठी आणि कुटुंबाला दोन घास जेवण मिळण्यासाठी समाजाकडे पैशाची भीक मागत किती फिरला ते त्याने सांगितले. या घटनेच्या आघाताने त्याच्या एका मुलाला कसे वेड लागले आहे, तो सगळ्यांना नकोसा असला आणि त्याच्यावर पुन्हा हल्ला होण्याची शक्यता असली तरी, गावात परत जाण्याचा त्याचा कसा निश्चय आहे हे त्याने आम्हाला सांगितले. .कारण घर म्हणता यईल अशी दुसरी कुठलीच जागा त्याच्याकडे नाही.

त्यानंतर झालेल्या खेड्यातील सभेने आमची विषण्णता अनेक पटींनी वाढवली. जवळजवळ 300 माणसे जमली होती. आम्ही बोललो पण कुणाला पश्चात्ताप झाल्याचा लवलेशही दिसला नाही. उस्मान दोषी असल्याची त्यांना खात्री होती. त्यानी आम्हालाच विचारले की पोलिसांनी अटक केलेल्या 'निर्दोष' लोकांबद्दल आपण सहानुभूती का व्यक्त करत नाही. बेशुद्ध उस्मानला पेटवून देण्याचा प्रयत्न करत असलेल्या जमावाला पांगवण्यासाठी जेव्हा पोलीसांनी गोळीबार केला तेव्हा पायाला गोळी लागलेल्या एका माणसाबद्दल आम्ही सहानुभूती का दाखवत नाही. दादरीमध्ये ज्या तऱ्हेने समर्थन झाले ठीक त्याचीच पुनरावृत्ति झाली. त्यांच्या शब्द कोशात मुस्लिम या शब्दाचा अर्थचमुळी दोषी असा होता, आणि हिंदूचा अर्थ निर्दोष आणि राष्ट्रवादी होत होता. न्याय किंवा साध्या माणुसकीच्या आधारावर आम्ही केलेल्या आवाहनाने तिथे जमलेल्या बहुसंख्यांकांच्या संतापात आणि शत्रुत्वाच्या भावनेत फक्त भर पडली, आणि त्यातल्या डाव्या आणि पुरोगामी संघटनामध्ये काही फरक नव्हता. कुठल्याही प्रकारची सहानुभूती नाही, कुठल्याही प्रकारचा पश्चात्ताप नाही.

दोन स्मरणपत्रे - लंकेशची हत्या आणि त्यांनी केलेल्या खुनशी हल्ल्यातून कसाबसा वाचलेल्या त्या म्हाताऱ्यामाणसाबद्दल त्याच्या शेजाऱ्यांना कणभरही सहानुभूती नसणे - या दोन्ही घटना म्हणजे ही प्रेमाची वारी किती गरजेची आहे ते दाखवणारी स्मरणपत्रे होती.

## दिवस ४ था

आमच्या या `प्रेमाच्या वारीच्या चौथ्या दिवशी अनपेक्षितपणे आम्हाला एक सुखद अनुभव आला. झारखंडमधील रामगढ जिल्ह्यातील मुख्यालयातील धर्मशाळेत आम्ही रात्र घालवली होती. तिथल्या स्थानिक गुरुद्वाराने आम्हाला आमंत्रण दिले व प्रेम आणि ऐक्य यासाठी केलेल्या वारीच्या आवाहनाला त्यांनी आपला पाठिंबा व समर्थन व्यक्त केले. त्यांनी आंतरधर्मीय एकता आणि सहिष्णुता याचा संदेश देणारी  नानक आणि कबीर या दोघांची शीख धर्मग्रंथात समाविष्ट असलेली कवने वाचून दाखवली.वाढत्या द्वेषाच्या आजच्या काळासाठी हा संदेश किती प्रासंगिक होता हे आम्हाला वक्त्यांनी सांगितले. एक लहानसा शीख समुदाय फाळणीनंतर येथे १९४७ पासूनस्थायिक झाला आहे. ह्या शीख समाजाला१९८४मध्ये शीख समुदाया विरोधातील धार्मिक सांप्रदायिक दंगलीत पुन्हा दुसऱ्यांदा उध्वस्त व्हावे लागले.आणि म्हणूनच या द्वेषाच्या धार्मिक सांप्रदायिक रूपातून भोगाव्या लागणाऱ्यायातनांबद्दल इतर समुदायांना सांगायची त्यांना गरज वाटते.

या भेटीनंतर आम्ही मानोआ ह्या मनुआ तालुक्यातील गावातील विधवा मरियम खातूनला भेटलो. मरीयमच्या नवऱ्याची दोन महिन्यापूर्वी भर बाजारात मारझोड करून निर्घृण  हत्या केली गेली पण ती न डगमगता लढा देते आहे.

२७ जुन२०१७च्या सकाळी कोळसा विक्रेता अमिलुद्दिन अन्सारी आपलीगाडी घेऊन घराच्या बाहेर पडला. साधारण १ तासानंतर त्याच्या १७ वर्षाच्या मुलाने, शहाबानने व्हाट्स ॲप्स वर अत्यंत धक्कादायक असे आपल्या प्रिय वडिलांवर होणाऱ्या जीवघेण्या मारझोडीचे चित्रीकरण पाहिले. ही मारझोड स्वयंघोषित गोरक्षक जमावाने केली होती.शहाबानने मागचा पुढचा विचार न करता वडिलांना वाचवण्यासाठी मोटरसायकलवरून धाव घेतली. आणि मोटारसायकल बंद पडली. त्याने आपल्या २२ वर्षाच्या भावाला शहझादला हे सांगितले. शहझाद व त्याची आई ताबडतोब रामगढकडे निघाले. त्यांनी पाहिले कि रस्त्याच्या मधोमध त्याच्या वडिलांची गाडी उलटी पडली आहे व वडिलांचे रक्त त्याठिकाणी सांडले आहे. लोकांनी त्यांना सांगितले की आमिलुद्दीनला पोलीस रांचीला जिल्हा इस्पितळात घेऊन गेले आहेत.

त्या दोघांनी रांचीकडे धाव घेतली. जिल्हा इस्पितळात त्यांना कळले की अमिलुद्दीनला रामगढच्या बाजारातील जमावानेच ठार केले होते. नातेवाईकांनी त्याचे छिन्नविछिन्न शरीर पहायला नको म्हणून पोलिसांनी घाईने त्याचे शवविच्छेदन केले होते. आज पर्यंत त्या शव विच्छेदनाचा रिपोर्ट कुटुंबियांना मिळालेला नाही. त्यादिवशी देखील पोलीस स्टेशनला अनेक चकरा मारल्यानंतर मध्यरात्र उलटून गेल्यानंतर काही वेळानी त्यांना प्रेत हाती मिळाले.

ह्या मारझोडीच्या अनेक घटनामध्ये द्वेषाची भयंकर विकृत अशी नवीनच सामाजिकता आढळत आहे, ती म्हणजे मारझोडीचे चित्रीकरण करावयाचे. अमिलुद्दिन अन्सारीच्या मुलांनी पाहिलेले भयानक चित्रीकरण आम्ही पाहिले. त्याचे वडील त्या मारझोडीचे बळी पडतानाचे ते चित्रीकरण होते. हे चित्रीकरण हे खून करणाऱ्या लोकांनीच केले आहे. अन्सारीच्या ह्या चित्रफितीमध्ये हल्लेखोर हसताना दिसतात आणि जीवाच्या आकांताने रक्तबंबाळ अन्सारी गयावया करत आहेत. त्यांचे ते हसणे पाहून असे वाटावे कि जणू काही एखादा विडीयो गेम चाललेला आहे किंवा ते एखादी चित्रफित पहात आहेत. एका क्षणी तर एका मुलाने अन्सारीचे तोंड हाताने धरून कॅमेरासमोर आणून विडीयो घेणाऱ्याला चांगला शॉट घ्यायला सांगितलेले दिसते. रस्त्यावर लाल मांसाचा ढीग दिसतो पण तो कार मधून काढतानाचा एकही शॉट नाही. अन्सारीच्या मृत्युच्या वेळी कोणीही त्याला मदत करायला, सहाय्य करायला पुढे आलेले नाही.

राज्य शासनाने शोकाकुल कुटुंबाला काहीही मदत वा सहाय्य केलेले नाही. कुटुंबातील लहान मुलांची शाळा सुटली आहे. ते मांस गोमांस होते का ह्या तपासासाठी गेले आहे. व्हीडीयोमध्येस्पष्ट दिसणाऱ्या हल्लेखोरांनाअटक केलेली नाही.त्यामुळेसंतापलेल्या स्थानिक मुलांच्या गटाने त्याचा निषेध केला होता तेव्हा मात्रपोलिसांनी या आंदोलकांच्या विरोधात अनेक गुन्हयाखाली खटले दाखल केले आहेत, निषेध करणाऱ्या मुलांनाच 25 दिवस तुरुंगात डांबले  गेले. काही हल्लेखोरांना नंतर अटक करण्यात आली, परंतु असे बरेच लोक अजून पकडले गेले नाहीत ज्यांची नांवे ही घटना प्रत्यक्ष पाहिलेले साक्षीदार देण्यास तयार आहेत. अन्सारी यांना फायबरग्लास बॅटनने मारणाऱ्या एका तरुणाचा फोटो आम्ही पाहिला तो बॅटन जवळजवळ पोलिसांच्या बॅटन सारखाच दिसतो आहे.

मारिअम खातून यांचीआम्ही भेट घेतली. त्या ठाम आणि खंबीर वाटल्या. अन्सारीयांचा  मृत देह ताब्यात घेताना पोलिसांनी दिलेल्या त्रासाबद्दल सांगताना त्या कोसळल्या.`मला फक्त न्याय हवा' हे त्या आम्हाला वारंवार सांगत होत्या. त्यांचे एकच म्हणणे होते की ``माझ्या पतीला जीवे मारणार्यांना शिक्षा झाली पाहिजे. मी त्यांच्यावर सूड उगवण्याच्यासाठी ही मागणी करत नाही तर मी व माझ्या मुलांनी ज्या यातना भोगल्या आहेत तशा यातना भोगायची पाळी आणखी कोणावर येऊ नये असे मला वाटते.".

मरीअम खातून आणि त्यांच्या परिवाराला भेटल्यानंतर रामगढमध्ये झालेल्या अमन सभेत आम्हाला थोडेसे हायसे वाटले कारण ह्या ठिकाणी लोक ह्या मारझोडीने बळी घेणा-यांचे समर्थन करत नव्हते. जो अनुभव आम्हाला आदल्या रात्री गिरिडीहमध्ये आला होता. (त्या ठिकाणी सर्वानुमते उस्मान अन्सारीने आदल्या दिवशी स्वतःच्या गाईला मारून केलेल्या गुन्हयाची शिक्षा त्याला मिळाली होती.) शहरातील काही वरिष्ठ वक्ते माझ्याशी सहमत झाले आणि म्हणाले की त्यावेळी त्यांनी गप्प न रहाता मारहाणीचा तीव्र निषेध करण्यासाठी काहीतरी हालचाल करायला हवी होती. त्या वेळी त्यांनी निषेध केला नाही याचा अर्थ त्यांची ह्या घटनेला मूक संमती होती असा होतो हे देखील त्यांना मान्य होते. ते त्यांच्या जिल्हयात अमन इन्सानियत समिती स्थापन करण्यास तयार झाले. ह्या समितीमुळे द्वेषातून होणाऱ्या हत्येसारख्या गुन्हयांना देखील आडकाठी होईल व असे गुन्हे घडल्यास ताबडतोबीने कृती करता येईल.

दुपारी आम्ही रांचीला पोहोचलो. त्या ठिकाणी स्थानिक ख्रिश्चन धर्मियांनी झारखंड विधानसभेने मंजूर केलेल्या धर्मांतर विरोधी निर्दयी कायद्याला विरोध करण्यासाठी एक महासभा आयोजित केली होती. हा कायदा ख्रिश्चन अल्पसंख्यकांमध्ये दहशत व भीतीचे वातावरण पसरवणासाठी आणि आदिवासी समाजामध्ये दुफळी निर्माण करण्यासाठी केलेला आहे अशी त्यांना भीती होती.आजच्या आदिवासी कुटुंबामध्ये एकाच कुटुंबात काही जण आदिवासी धर्म मानणारे आहेत तर काहींनी ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला आहे तर काही स्वत:ला हिंदू मानतात. ह्या शोषितांच्या, जातीय व धार्मिक अल्पसंख्यांकाच्या व उदारमतवाद्यांच्याविरुद्धच्या हिंसेच्या विरोधात, लोकांमध्ये कोणताही भेदभाव करण्याच्या विरोधात उभे राहणे व ह्या प्रेमाच्या वारीच्या उद्देशाशी सहमती दाखवणे हे ह्या एकजुटीने बोलावलेल्या सभेचे उद्दिष्ट होते.

एक दिवस प्रवास करून, आम्ही आता कर्नाटकमध्ये मंगलोरला जाणार आहोत. त्या ठिकाणी निडर व न्यायासाठी लढणाऱ्या, निधर्मी मूल्यांचा स्वीकार केलेल्या गौरी लंकेशच्या मृत्यूच्या शोकात आम्ही वारकरी सामील होऊ आणि तिला श्रध्दांजली वाहू. ही वारी विद्वेषी जमावाने मिळून लोकांना ठार मारण्याच्या या नव्या सामाजिक रोगाच्या उद्रेकामुळे भयभीत झालेल्या, आघात सहन केलेल्या कुटुंबियांना भेटून त्यांची क्षमा मागण्याचे काम करण्यासाठी पुढच्या मुक्कामी निघेल.

## दिवस ५ वा

वारी प्रेमाची च्यावाटचालीतील आजचा पांचवा दिवस. आम्ही मंगलोरला आलो. कर्नाटकाच्या किनारपट्टीच्याप्रदेशात द्वेषभावना वाढवणे व द्वेषातून केलेले हल्ले यासाठीची एक प्रयोगशाळा म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रदेश वापरला जात आहे.

स्थानिक कार्यकर्ते विद्या दिनकर व समवर्ती यांच्या बरोबर केरळ सीमेपासच्या गावात स्थाईक होण्यासाठी नुकत्याच स्थलांतर केलेल्या एका कुटुंबाची भेट घेण्यासाठी गेलो. अब्दुल शमीर हा रोजंदारी करणाऱ्या लाखो लोकांसारखा मजुरी करुन जगणारा एक मजूर. वयाच्या १३व्या वर्षी तो मुंबईतीलएका खानावळीत मजुरीसाठी आला. त्या नंतर त्याने अनेक कामाचीठिकाणे बदलली. तो काही दिवस आखाती प्रदेशात पण गेला. त्याने मंगलोर येथे रिक्षा देखील चालवली. त्याच्यावर २३ ऑगस्ट २०१४ रोजी हल्ला झाला. त्याने नोकऱ्याबदलल्या ते आधिक पैसे मिळवण्यासाठी. शेतकऱ्यांनी विकलेली म्हातारी गुरे कसाईखान्यात नेण्यासाठी केलेल्याटेम्पोचा चालक म्हणून त्याला दर दिवशी १००० रुपये मिळणार होते.

मंगलोर शहरावरूनजाताना त्याचा टेम्पो एक दिवस एका पिवळ्या बसने आडवला. त्या बस मधून बजरंग दलाचे स्वयंसेवक उतरले. त्यांच्या हातात त्रिशूल व लोखंडाच्या सळ्या होत्या. ते हादरवणाऱ्या, भीतीदायक घोषणा देत होते. तो एवढा घाबरला की त्याला पळून जायचे देखील सुचले नाही. त्या जमावाने त्याच्या टेम्पोची काच फोडली. त्यांनी त्याला बाहेर खेचले व त्याला लोखंडी सळ्यांनी मारायला सुरवात केली. त्या जमावात त्याला त्याच्या बरोबरीचा एक रिक्षा चालक दिसला. त्या रिक्षा चालकाने अब्दुल बरोबर अनेकवेळा गोमांस खाल्ल्याचे त्याला आठवत होते. अब्दुलने वाचवण्यासाठी

त्याला हाक दिली. पण त्या रिक्षावाल्याने हल्लेखोरांची साथ दिली. त्याची  मारहाण वाढत चालली होती. . तो मार थांबला तेव्हा एकाने अणकुचीदार त्रिशूल त्याच्या डोक्यात खुपसला. तो बेशुध्द झाला आणि त्यानंतरचे  त्याला काहीच आठवत नाही.

त्याला नंतर कळले की त्याच्यावर ज्या ठिकाणी हल्ला झाला होता त्या ठिकाणापासून पोलीस चौकी अगदी रस्त्याच्या पलीकडेच होती. पोलीस खूप उशीरा पोचले. ते पोचले तो पर्यंत तो जवळ जवळ मेलाच होता. त्यांनी त्याला सार्वजनिक इस्पितळात नेले. पण त्यांनी त्याच्या कुटुंबियांना काहीही कळवले नाही. घरचे अर्थातच काळजीत होते की तो अजून घरी पोचला का नाही. त्यांनी त्याच्या मोबाईलवर फोन केला. इस्पितळातील नर्सने तो फोन उचलला तेव्हा घरच्यांना कळले की तो कुठे आहे.

त्याच्या वडिलांनी त्याला खाजगी इस्पितळात नेण्याचा आग्रह धरला. चार महिन्यात त्यांनी चार लाख रुपये खर्च केले. हे पैसे उभे करण्यासाठी त्यांनी त्यांचे छोटे घर विकले व अब्दुलच्या बहिणीच्या लग्नासाठी जमवलेले सारे पैसे खर्च केले. अब्दुल अनेक आठवडे बेशुध्द होता. तो शुद्धीवर आला तो देखील नळ्यांच्या वेढ्यात. तो आपल्या मुलांना ओळखू शकत नव्हता.त्याला उभे रहाता येत नव्हते कीचालता पण येत नव्हते.तो इस्पितळातून बाहेर आल्यानंतर त्याच्या बायकोने त्याची दिवस-रात्र सेवा केली व अक्षरश: त्याला कडेवर घेऊनच ती त्याची काळजी घेत होती.

तेव्हापासून लोकांनी केलेल्या धर्मादाय मदतीवर त्याचे आयुष्य चालू आहे. ही मदत करणारे सामान्य मुसलमान आहेत. त्याच्यासाठी टीव्हीवर केलेल्या मदतीच्या कारुण्यमय भावनाशील आवाहनाचा परिणाम होऊन अनेक ठिकाणांहून त्याला देणग्या दिल्या गेल्या. त्या पैशातून त्याच्या वारंवार इस्पितळातल्या वास्तव्याचा खर्च तसेच त्याच्या बहिणीच्या लग्नाचा खर्च आणि दैनंदिन खर्च चालतो आहे. ऑटोरिक्षा चालकांच्या युनियनने, या युनियनचे सभासद मोठ्या प्रमाणात हिंदू आहेत, त्यांनी त्याच्या एका इस्पितळातील वास्तव्याचे एक लाखाच्या वर असलेले बिल दिले. काही दिवासांपूर्वी एका महिलेने त्याच्या घरासाठी लागणारे अर्धे पैसे (एकूण किंमत १२ लाख) त्याला देणगी म्हणून दिले आहेत. उरलेले अर्धे पैसे लोकांकडून जमवले आहेत. आज तो वॉकरच्या सहाय्याने चालतो. त्याचे बोलणे अस्पष्ट आहे, पण मनाने तो जागरूक आहे. बहुदा त्याला कायमचे अपंगत्व स्वीकारणे भाग पाडले आहे.

असे सर्व असले तरी त्याला न्याय मिळालेला नाही. पोलिसांनी त्याच्या काही हल्लेखोरांना अटक केली. पण ते लोक काही दिवसात जामिनावर सुटले. अजून खटला उभा राहिलेला नाही. पोलिसांनी त्याच्या विरुध्द कर्नाटकातल्या १९६४च्यागोहत्याबंदीच्या  कायद्यांतर्गत केस केली आहे आणि तो अटक होता होता वाचला कारण त्याने अटकपूर्व जामीन घेतला होता. आपण हे लक्षात घेऊया की कर्नाटकात कॉंग्रेसचे राज्य आहे.

## दिवस ६ वा

आपण माझ्या कर्नाटकाच्या किनारपट्टीच्या प्रदेशातील सहाव्या दिवसाचा अहवाल वाचण्यापूर्वी मी येथे लावलेला  एका युवकाचा फोटो पहा. त्याने त्याच्या हाताने हृदयाचा आकार दाखवलेला आहे. हा फोटो त्याच्या मित्राने ज्या दिवशी घेतला तो त्याच्या मरणाच्या दिवस ठरला होता. त्याच्या उद्विग्न कुटुंबीयांना त्या रात्री त्याच्या विच्छिन्न मृत शरीरावरील मोबोईलमध्ये  तो फोटो मिळाला.

त्याचे नांव हरीश पुजारी. तो मुस्लीम आहे ह्या चुकीच्या समजुतीमुळे त्याला जमावाने ठार केले हे अधिक भयावह आहे?त्याला मुस्लीम समजले गेले कारण तो त्याच्या मुस्लिम दोस्त सामिउल्लाहच्या मोटर सायकलवर पाठीमागच्या सीटवर बसून जात होता.

बन्तवाल गावात हरीशचे वडील घरात बिडी वळण्याच्या कामातून मिळणाऱ्या तुटपुंजा कमाईवर गुजराण करत होते. म्हणून त्यांच्या एकुलत्या एक मुलाला,  हरीशला ९वीत शाळा सोडावी लागली. व त्याने हाताखाली काम करून इलेक्ट्रिशियनचे काम शिकून घेतले. त्याच्या आईचा तो आज्ञाधारक मुलगा होता. तो त्याची सर्व कमाई आईकडे घर खर्चासाठी देत असे. घराची आर्थिक परिस्थिती आणखी बिघडली कारण त्याचे वडील कॅन्सरने आजारी पडले.

१२ नोव्हेंबर २०१५ च्या दिवशी हरीशने मित्रांबरोबर सहलीसाठी एक दिवस सुट्टी घेतली होती. तो घरी आला व आईने बनवलेल्या चहात घालायला दूध हवे म्हणून दूध आणायला परत बाहेर पडला. गेला तो परत आलाच नाही. त्याची आई सिताम्मा रात्रभर न झोपता त्याची वाट पहात जागली. हरीशचे वडील अंथरुणातून उठूच शकत नव्हते. हरीशची बहिण मितालाक्ष्मी घरातल्या एका लग्नसमारंभासाठी दुसऱ्या गावी गेली होती. दुसऱ्या दिवशी तिच्या मृत मुलाला घरी आणले गेले. त्याला १४ ठिकाणी भोसकले होते. तिला हे समजत नव्हते की हे कोणी व का केले असेल.

नंतर घटनांचे तुकडे तुकडे जोडून जो घटना क्रम समजला तो असा. तो दूध घेऊन घरी येत असताना त्याचा जिवलग मुस्लिम मित्र सामिउल्लाह  याने हरीशला घरी सोडण्यासाठी मोटारसायकलवर पाठीमागे बसवले. घर तीन मिनिटावर होते. पण वाटेत काही लोकांचा गट आडवा आला. ते स्वत:ला बजरंग दलाचे म्हणून घेत होते. त्यांनी त्यांना उतरवले व त्यांच्या अंगावर धावून गेले.  त्यांच्या हातात सुरे होते. सामिउल्लाह गंभीर जखमी झाला पण तो अखेर वाचला. हरीशवर १४ वार केले गेले व त्याचे आतडे बाहेर काढले गेले. त्यामुळे तो त्या हल्ल्यात मेलाच.

वारी प्रेमाची चे वारकरी सिताअम्माला व तिच्या मुलीला ह्या घटनेनंतर जवळजवळ दोन वर्षांनी भेटले. हरीशची आई आजून देखील हे पचवू शकलेली नाही की एवढा द्वेष कसा की जो सहज कुणाला ठार मारतो आणि तिच्या मुलाचा अशा द्वेषाने बळी घेतला आहे. त्याला जीवे मारणारे लोक त्याला ओळखत देखील नव्हते. त्याचे वडील ह्या आघाताच्या धक्क्याने हरीशच्या मरणानंतर जेमतेम दोन महिने जगले. मितालाक्षी एका यात्रा कंपनीत नोकरी करते व आपले कुटुंब जगावे ह्यासाठी धडपड करते आहे. त्या दोघींना आम्ही काय सांगणार? त्यांचे सांत्वन कसे करणार? आम्ही त्यांचे दु:ख समजून घ्यायचा प्रयत्न केला ह्या व्यतिरिक्त आम्ही काय करू शकलो असतो?

अत्यंत जड अंत:करणाने त्यांच्या घरून आम्ही मंगलोरला गेलो. त्या ठिकाणी अमन सभेसाठी खूप लोक जमलेले दिसले. ते अमन सभेसाठी आणि आमच्या स्वागतासाठी जमले होते. आम्ही गौरी लंकेशला आणि सांप्रदायिक राजकारणाच्या विरोधात तिने केलेल्यालढाईला मानवंदना दिली.आम्ही एकत्रितपणे विचारमंथन केले. कर्नाटकच्या किनारपट्टीचा हा प्रदेश विविध धर्माच्या लोकांच्यातील एकोप्यासाठी प्रसिध्द होता. आज तो सांप्रदायिकतेच्या धगीने पोळून निघत आहे आणि 2004 पासून हिंसक विद्वेषी जमावाने ठार मारण्याच्या हिंदुत्वाच्या राजकारणाची प्रयोगशाळा बनवला गेला आहे. या साऱ्याबद्दलउघडपणे बोलण्याची गरज कशी आहे हे त्यांना पटवायचा आम्ही प्रयत्न केला. त्या बोलण्याचा परिणाम झाला व अमन इन्सासानियत नागरी समितीची स्थापना करायचे ठरले. ही समिती द्वेषातून उद्भवणारे गुन्हे थांबवण्याचा प्रयत्न करेल व अशा घटनांची नोंद करेल. ह्यातील अत्याचार झालेल्यांना कायदेशीर न्याय मिलेल ह्याची खात्री करून घ्यायचा प्रयत्न करेल. ह्या शिवाय अत्याचार, हल्ले झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना मदतीचा हात देईल.

त्या दुपारी संयोजक आम्हा काही जणाना घेऊन कृष्णपुडा गावात घेऊन गेले. ह्या ठिकाणी दु:खी कुटुंबावर वेगळ्या पद्धतीने अत्याचार झाले होते. हे अत्याचार जमावाने नाही तर ह गणवेशातील लोकांनी गो पालनाच्या नावाखाली केलेलेहोते. . १९ एप्रिल २०१५ रोजी ही घटना घडली, म्हणजे कॉंग्रेसने राज्याची सूत्रे हाती घेतल्यावर १ वर्षांनी. हे कुटुंब हे रोजावर काम करणाऱ्यांचे होते. मृत झालेल्याच्या भावाने, इम्तीआझने आम्हाला सांगितले कि कबीर त्याचा २२ वर्षाचा सर्वात लहान भाऊ हा रंगारी होता. त्याला रंगाची आलेर्जी होऊ लागली म्हणून तो दुसरे काम शोधू लागला. कर्नाटक राज्याच्या कायद्याप्रमाणे म्हातारी गुरे कसाईखान्यात विकायला परवानगी आहे. आणि अशा जनावरांच्या वाहतुकीतून चांगला पैसा मिळतो. कबीरला ह्या गुरे वाहून नेण्याच्या ट्रकमध्ये गुरांना भरण्यासाठीचे काम मिळाले. त्या कामाचा दिवसाचा रोज १००० रुपये होता. शेतकरी त्यांची गुरे शिमोग्याच्या मोठ्या बाजारात विकायला न्यायचे. व त्यांचे ट्रक हे किनारपट्टीला जायचे. कबीरला कळले की ह्या ठिकाणी प्रत्येक चेकपोस्टवर पोलिसांना पैसे द्यावे लागतात. त्यांचे एक racket आहे. असे पैसे दिल्यावर गुरांचे ट्रक पुढे जाऊ देतात. कबीरचा ट्रक सांगिरी येथीलटानिकोट चेकपोस्टवर अडवला. माओवादी लोकांशी लढण्यासाठी जे खास पोलीस पथक आहे त्या पोलिसांनी ट्रक अडवला होता. तो थांबवण्याची कारणे काय होती ते कळले नाही. त्याठिकाणी पैसे देऊन देखील काहीतरी वाद झाला. एका हवालदाराने हवेत गोळीबार केला. चालक, क्लीनर आणि अन्य हमाल तेथून पळाले. पण त्याने कबीरला सरळ गोळी घातली. असे सांगणे कठीण होते की मेलेला मनुष्य हा नक्षलवादी होता म्हणून त्याला मारले. गोरक्षा हे ह्या पोलिसांचे कामच नव्हते. आणि गोरक्षा हे काम असले तरी त्यासाठी  माणसाला ठार मारायची गरज काय? ह्या घटनेच्या विरोधात मोठा आवाज उठवला गेला आणि अखेर त्या हवालदारावर खुनाचा गुन्हा दाखल केला गेला. काही दिवसांपसून अशा काही हालचाली केल्या जात आहेत की त्यानुसार राज्य सरकार खटला चालू न होताच केस बंद करण्याच्या दृष्टीने विचार करत आहे.

## दिवस ७ वा

एका दिवसाच्या सुट्टीनंतर आज सातव्या दिवशी दिल्ली येथे परत वारी प्रेमाची एकत्र भेटली. आता दहा दिवासांचा बसचा प्रवास सुरु होणार होता. हा बस प्रवास चार राज्यातून होणार होता.

आम्ही उम्मीद अमन स्नेह घर, कुतुब येथे सकाळी भेटलो. तेथून राजघाटला गेलो, महात्मा गांधींच्या समाधीला मानवंदना करून आम्ही तिलक विहारला पोचलो. या ठिकाणी १९८४च्या शिखांच्या शिरकाणानंतर विधवा झालेल्या स्त्रिया तीस वर्षापासून रहातात.

वारीतील आम्हा सगळ्यांना वाटले की जी प्रेमाची वारी आज द्वेषातून जमावाने केलेल्या अत्याचारातून वाचलेल्यांचे सांत्वन करण्यासाठी, त्यांना सोबत असल्याची जाणीव देण्यासाठी निघाली आहे तिने स्वतंत्र भारताच्या ७० वर्षाच्या इतिहासातील जुन्या व वेदनादायक धार्मिक व जातीय द्वेषाच्या घटनांची मालिकाही आठवायला हवी. ह्यातील सर्वात मोठे शिरकाण झाल्याची घटना म्हणजे १९८४ सालची. दिल्लीच्या रस्त्यावर ३००० शिखांचे शिरकाण केले गेले होते. ती घटना होऊन ३३ वर्षे झाली. पण तेव्हापासून ज्या कष्टकरीविधवा स्त्रिया येथे स्थायिक झाल्या आहेत त्या अत्यंत दु:खद आठवणींसोबत, हलाखीच्या परिस्थितीत त्यांची मानसिक दृष्ट्या आजारी मुले सांभाळीत अमली पदार्थाचे सेवन करण्यापासून बचावाचे प्रयत्न करत आयुष्य काढत आहेत. आजही त्यांना जी गोष्ट सतावते आहे ती म्हणजे नन्यायव्यवस्थेने  त्यांची केलेली वंचना. कारण त्यांच्यावर हल्ले करणाऱ्या आणि हे हल्ले घडवून आणलेल्या अनेकांपैकी थोड्यांनाच शिक्षा झाली आहे.

तिलक विहार येथील मोठ्या संख्येने हजर असलेल्या सर्वांसमोरह्या भयंकर दारुण इतिहासाचा पट अनेक वक्त्यांनी मांडला. तिलकनगरच्या अनेक रहिवाशांनी त्यांचे विचार मांडणारे काही फलक दोऱ्यांवर वर टांगले होते. ह्यापैकी एकावर १९८४ सालच्या शिरकाणात विधवा झालेल्या एका स्त्रीने लिहिले होते `मी जे दु:ख सहन केले तशी वेळ कधीच कोणावरही यायला नको!' लोकांनी देशातील वाढत्या द्वेषाच्या वातावरणाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की जमावांनी केलेले रानटी हल्ले, लोकांना घरात आणि भर रस्त्यात जिवंत जाळणे अशा गोष्टी ऐकल्यावर १९८४ साली गाड्यांत आणि रस्त्यावर लोकांना जाळल्याच्या त्या दारुण व भीतीदायक घटना आठवतात. त्यांनी देशात विविध धर्म व पंथाच्या लोकांना प्रेमाने व शांतीपूर्ण वातावरणात राहता आले पाहिजे असे ठामपणे मांडले.

अनेक कवींनी व गायकांनी प्रेमाची व शांतीची गाणी कानात गुंजत राहावी अशा पद्धतीने गायली. तिलक विहारमधली मुले व रस्त्यावर आकाशाच्या  छप्पराखाली रहाणाऱ्या मुलांनी नाच केले व गाणी गायली. सोनम कालरा, धृव संगारी व श्वेता तिवारी ह्यांनी बुलेशाहा, फैज व जावेद अख्तर यांच्या दैदिप्यमान कविता गायल्या. अदनान काफील, देवेश, व सुरज त्रिपाठी यांनी देखील कविता सादर केल्या. फौजिया, सईदा हमीद आणि लोकेश जैन यांनी नाट्य वाचन केले. सावित्री फुले बँड या तरुण वाद्यवृंदाने देखील गाणी सादर केली. कार्यक्रमाची सांगता तिलक विहार मधील मुलांच्या भांगड्याने झाली.

संध्याकाळी दिवसाच्या अखेर जे नवीन लोक `प्रेमाच्या वारी'त सामील होणार होते त्यांना स्टेजवर बोलावण्यात आले. ह्या नव्याने सामील होणाऱ्या लोकांमध्ये लेखक, वार्ताहार, विद्यार्थी, चित्रपट

बनवणारे, फोटोग्राफर्स, वकील, समाजिक कार्यकर्ते, शिक्षक, धर्मगुरू, आरोग्यसेवेशी संलग्न कर्मचारी, शास्त्रज्ञ इत्यादी विविध काम करणारे लोक होते.

## दिवस ८वा

आम्ही दिल्लीहून निघाल्यानंतर मध्यरात्री उत्तर प्रदेशातील शामली जिल्ह्यातील कांडला शहरात पोचलो. ह्या शहरात मुस्लीम बहुसंख्य आहेत. यापैकी काही हजार लोक २०१३च्या मुजफ्फरपुर दंग्यात विस्थापित झालेले आहेत. त्यांना परत शहरात येऊ दिले गेलेले नाही ते इथे वस्ती करून आहेत. भाजपच्या हुकुमसिंगने देशातील वर्तमानपत्रात मुख्य मथळ्यात बातमी झळकावली होती की येथील बहुसंख्य मुस्लीमानी येथील शांतताप्रिय हिंदुना धमकावून त्यांना बेघर, निर्वासित व्हायला भाग पाडले आहे. हे नंतर सिद्ध झाले की बातमी खोडसाळ आणि पूर्णत: खोटी होती पण त्या बातमीतील विष मागे राहिलेच. हे उल्लेखनीय आहे कि राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने देखील ह्या खोट्या बातमीचा समाचार घेतला पण ह्या आयोगाने २०१३ मध्ये लाखोने विस्थापित झालेल्या लोकांच्या हक्कांसाठी काहीच सहाय्य केले नाही. आम्हाला वाटले अशा प्रकारच्या सांप्रदायिक वातावरणात ज्या ठिकाणी शहरातील बेघर झालेल्या लोकांचे पुनर्वसन केले आहे अशा या कांडला शहरात रात्र भर राहणे हे वारीच्या उद्दिष्टात बसणारे आहे. आम्हाला मुक्कामाला एका मदरासेत जागा दिली गेली.

आम्ही सकाळी शाबिरपूर ह्या सहारनपुर जिल्ह्यातील देवबंद निवडणूक मतदारसंघातील गावाला भेट दिली. ह्या गावाचे नांव काही दिवस प्रसिद्धीच्या झोतात आले होते आणि आता ते दृष्टीआड गेले होते. हे गांव दिल्ली पासून १५० किलो मीटर वर आहे.

या गावातील विवादाच मुद्दा सुरु झाला तो या गावातील दलितांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा गावात रविदास मंदिराच्या आवारात उभा करायचा होता त्यावेळ पासून. त्यांनी हा पुतळा उभा करण्यासाठी पैसे जमवले व पुतळा बनवायला  सहारनपुर येथे दिला. त्यानंतर त्यांनी पुतळ्यासाठी एक उंच चौथरा बांधायला सुरवात केली. १४ एप्रिल २०१७ रोजी आंबेडकर जयंती निमित्त पुतळ्याचे अनावरण करण्याची जय्यत तयारी केली गेली.

मध्यंतरीच्या काळात भाजपनी मोठ्या संख्येने निवडणूक जिंकली. उच्च जातीतील राजपूत रहिवाश्यामध्ये काहीतरी नाराजी दिसू लागली. त्यांनी जास्त उंचीच्या पुतळ्याच्या चौथ-याबद्दल निषेध नोंदवला. शिवाय गावातील ज्या रस्त्याचा वापर ते पण करतात त्या रस्त्याकडे पुतळ्याचे तोंड असणे यालादेखील त्यांचा विरोध होता.‘आता आमचे राज्य आले आहे’ असे ते म्हाणाले असे सांगण्यात आले. त्यांना असे वाटले कि चांभाराना त्यांची पायरी दाखवायची गरज आहे. दलितांनी संतापून सांगितले कि मंदिराची जागा त्यांच्या कायदेशीररीत्या मालकीची आहे. आणि कोणाचा पुतळा कसा उभा करायचा हा निर्णय घेण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. शासनाने मध्यस्थी केली व दलितांना रीतसर परवानगी मागण्यासाठी अर्ज करायला सांगितले. त्यामुळे जयंती होऊन गेलीव पुतळ्याचे अनावरण लांबले.

5 मे रोजीराणा प्रताप जयंती राजपुतांनीमोठ्या थाटामाटात साजरी करायचे ठरावले. मिरवणुकीची सुरवात मोठ्या कर्ण्यांच्या कर्कशकानठळ्या देणाऱ्या आवाजात, गावामध्ये ह्याला `डीजे' असे म्हणतात,

त्याने झाली. नाराज झालेल्या दलितांनी पोलिसांकडे तक्रार केली कि आम्हाला पुतळा आमच्या जागेत उभारायला परवानगी लागते तशीयांनी पणरस्त्यावर  आवाज करताना डीजेसाठी परवानगी घ्यायला हवी. पोलिसांनी हे मान्य केले व डीजेची जुळणी काढायला लावली.

राजपुतांनी हा अपमान वाटून घेतला व ते रागाने पेटून उठले. त्यांनी आजूबाजूच्या राजपूत समाजाच्या मंडळींना बोलावले. ते सारे मोटार सायकलवर स्वार होऊन व गाड्या घेऊन हाती तलवारी व सुरे घेऊन आले. ते अपमानजनक घोषणा देत होते. त्यांनी स्त्रिया व पुरुषांवर हल्ले केले. ३०पेक्षा जास्त घरांना आग लावली. त्यांच्या घरातील भांडी-कुंडी व फर्निचर टेलिव्हिजन सेट ह्याची तोडफोड केली. पोलीस पांच तास गप्प बसून फक्त पहात होते. त्यांनी त्या हल्लेखोरांना अजिबात अडवले नाही. राजपूत पुरुषांनी आगीच्या बंबाला गावात येऊ दिले नाही. आपल्या गाड्या व सायकली मध्ये घालून  त्यांनी बंबाचा रस्ता आडवला.

चार महिन्यांनंतरही , दलित अगदी वाईट परिस्थितीत होते. आर्थिक दृष्ट्या त्यांची परिस्थिती हलाखीची होती. पण त्यांचा राग व त्यांची प्रतिकाराची आस अजून निवली नव्हती. त्यांच्यापैकी बरेचसे भूमिहीन होते व ते आधी वरिष्ठ जातीच्या शेतात व वीट भट्टीवर काम करायचे. पण आता हे त्यांना शक्य नव्हते त्यामुळे आता ते बेकार होते. कारण राजपुतांनी त्यांच्यावर आर्थिक बहिष्कार टाकला होता. कोणाही दलिताला काम द्यायचे नाही असे पक्का निर्धार त्यांनी केला होता. सरकारने प्रत्येक घरासाठी २५००० रुपये देऊ केले व सरकारकडे पैसेच नाहीत असे कारण सांगत आणखी काही मदत देण्याचे नाकारले.. दलितांनी नावे सांगितलेल्या काही थोड्या लोकांना पोलिसांनी अटक केली. पण पोलीस एवढेकरून थांबले नाहीत तर उलट त्यांनी अन्याया विरुद्ध आवाज उठवणाऱ्या अनेक दलित नेत्यांना भयंकर कलमे लावून अटक केली. अनेक दलित आज अटकेत आहेत.

शतकानुशतके दलितांना दाबून ठेवलेले आहे. आणि त्यांनी कधी प्रतिकार केलाच तर त्यांना कडक व क्रूर पध्दतीने नेस्तनाबूत केले गेले आहे. पण शाबिरपूरचे दलित वाकायला तयार नव्हते. त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करायचे ठरवले. त्यांनी त्यांच्याकडील साऱ्या हिंदू देवताच्या मूर्तीचे विसर्जन केले. व त्यांनी मोठ्या समुदायांनी बौध्द धर्म स्वीकारला. 'जय भीम' हा त्यांच्या लढाईचा नारा होता. मुलाबाळांनी देखील गळ्यात जय भीमची पदके अडकवली. ही मुले त्यांच्या वर्गातील सहाध्यायाशी व शिक्षकांशी भांडण करू लागली. आमच्या मिटींगमध्ये स्त्रिया जास्त मोठ्या प्रमाणात बोलत होत्या. प्रतिकाराचा त्यांचा निर्धार पक्का होता. त्यांच्यावर झालेल्या शारीरिक अत्याचाराबद्दल जाहीर सभेत बोलायला या कचरल्या नाहीत.  व पोलिसांनी त्या अत्याचारासाठी कोणालाही  सजा देण्याचे नाकारले होते त्याची निंदा केली.

वारीतील काहीजण राजपुतांना भेटायला गेले. त्यांची दलितांच्या प्रती असलेली तुच्छता त्यांनी व्यक्त केली व वर असे सांगितले की दलितांनी त्यांची घरे मोबदला मिळावा, अनुदान मिळावे म्हणून स्वत:च्या हाताने जाळली आहेत. आम्ही त्यांना विचारले कि त्यांनी स्वत:ला मारून पण घेतले का? ह्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले नाही पण त्यांना कोणच्याही गोष्टीबद्दल पश्चाताप नव्हता.

आम्ही शाबिरपुर सोडले ते दलितांकडून स्फूर्ती घेऊन. पण आम्हाला यातना ही होत होत्या. अनेक आदिवासी व दलितांवर अत्याचार करून त्यांना कसे सातत्याने दबवले जाते हे प्रत्यक्ष पाहाण्याचा अनुभव ह्या वारीतल्या अनेकांनी प्रथमच येत होता. शाबिरपूरच्या दलितांनी आत्मसन्मानासाठी  आणि

समानतेसाठी लढायचे ठरवले आहे. त्यासाठी फार मोठी किंमत त्यांना द्यावी लागत आहे पण ती त्यांनी द्यायचे ठरवले आहे. त्यांची लढाई फक्त त्यांच्या आत्मसन्मानासाठी नाही तर ते आपल्या सर्वांच्या वतीने लढत आहेत.

## दिवस ९ वा

वारीचा शामली मधला दुसरा दिवस. या ठिकाणी योगी आदित्यनाथ यांच्या सरकारच्या हातात सूत्रे आल्या नंतरमुस्लीम कुटुंम्बियांवर झालेल्या वेगळ्या प्रकारच्या अत्याचाराच्या  पश्चिम उत्तर प्रदेश मधील कहाण्या  आमच्या समोर आल्या. वर्तमानपत्राच्या पहिल्या  पानावर सनसनाटी मथळ्याखाली बातम्या दिल्या जातात, ''खतरनाक गुन्हेगार' पोलिसांच्या गोळीबारात मारला गेला किंवा जबरदस्त जखमी झाला. वर्तमानपत्रे या अशा बातम्या कोणतीही शहानिशान करता बिनदिक्कत देत जातात. उत्तर प्रदेशात नव्या सरकारने सूत्रे हातात घेतल्या पासून अशा हत्येच्या ३० घटना घडल्या आहेत. माध्यमे ह्या बातम्या अत्यंत तत्परतेनेछापतात पण अजिबात विचार करत नाहीत की अशा रीतीने मरणारे लोक हे नेहमीच मुस्लीम कसे काय असतात. वार्ताहरांना हे लक्षातच येत नाही असे मारले गेलेले जखमी किंवा मरण पावणारे लोक हे किरकोळ गुन्हे केलेले किंवा ज्यांच्या नावे कधी गुन्हा नोंदवलाच गेलेला नाही असे निरपराध लोक कसे असतात. ह्याकडे पण दुर्लक्ष केले जाते कि अशा प्रकारच्या गुन्हेगारांसोबत समोरासमोर झालेल्या झटापटीत पोलीस गंभीर जखमी झाले आहेत असे कधीच कसे होत नाही. हाताला वा खांद्याला थोडेफार लागले आहे असे फक्त दाखवले जाते.

आम्हाला एक कुटुंब भेटले पण येथे त्यांचे नाव देत नाही कारण पोलिसांकडून त्यांना त्रास होऊ शकतो. त्यांचा मुलगा विशीतला तरुण. त्याच्या नावावर कोणताही गुन्हा नोंदवला गेलेला  नव्हता. . त्याला व त्याच्या मित्राला दोघांना आपापल्या गावातून पोलिसांनी पकडले. त्याच्या अटकेचे कोणतेही दस्तेवज न नोंदवता त्या दोघांना डांबून ठेवले. त्यांना एक दिवस रात्री उसाच्या शेतात नेण्यात आले व पोलीस म्हणाले धावा. ते घाबरलेले होते पण त्यांनी धावायला नकार दिला. ते घाबरलेले होते पण पळाले तर पोलीस पाठीमागून गोळ्या झाडतील ही भीती वाटत असल्यामुळे ते नको म्हणाले.नंतर पोलिसांनी त्यांना शेतात झोपायला लावले व त्यांच्या ढोपर घोटा चवडे या ठिकाणी गोळ्या मारल्या.

पोलिसांनी दुसऱ्या दिवशी जाहीर केले की ते दोघे खतरनाक गुन्हेगार होते. व ते पळून जात असताना त्यांनी पोलिसांवर गोळीबार देखील केला. स्वत:चा जीव वाचवण्यासाठी पोलिसांना त्यांना गोळी मारायला लागली. पण हे कोणीच विचारले नाही की ते पळून जाता असताना देखील त्या अंधाऱ्या रात्री उस पूर्ण पणे वाढलेला असताना पोलिस अचूक नेमाने ढोपरावर, घोट्यावर कसे काय गोळ्या मारू शकले. आज त्यांचा मुलगा तुरुंगातच आहे. त्याला सतत अतिशय वेदना होत असतात. . ते रोजंदारीवर काम करतात. पण त्यांचे सर्व पैसे तुरुंगाच्या इस्पितळातील औषधांसाठीखर्च होतात. . त्यांच्याकडे आता वकील उभा करायला पैसेच नाहीत. त्यांना अशी भीती वाटते कि त्यांचा मुलगा जन्मभर चालूच शकणार नाही. त्याहून अधिक भीती अशी वाटते कि तो स्वत:ला निरपराध सिद्ध करू शकणार नाही.

या सारख्या घटना नेहमीच घडत असतात. योगी आदित्यनाथ यांच्या उत्तर प्रदेश मध्ये अशा प्रकारचा रक्तपात रोज घडतो  आणि हे रक्तपात  हे पोलिसांनी केलेल्या एनकाऊंटरच्या गणतीत जमा होतात. निवडणूक प्रचाराचा भाग म्हणून भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने वजन टाकून अशा बातम्यांना मुद्दामहून पसरवले आहे, त्याला हवा दिली आहे की पश्चिम उत्तरप्रदेश मधील मुस्लीमांमुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे आणि ह्या प्रचारात अधिक भर पडली ती २०१३च्या दंग्यांनंतर अनेक मुस्लीम हे मुस्लिमबहुल प्रदेशात राहू लागले त्यानंतर. ह्या बरोबरीने खतरनाक गुन्हेगार म्हणूनपोलिसांनी मोठ्या प्रमाणात मारलेले मुसलमानच होते यामुळे मुस्लीम हे गुन्हेगार असतात या मुस्लिमांबद्दलच्या पारंपारिक समजेमध्ये भरच पडली. आणि त्यामुळे योगी आदित्यनाथांचे मजबूत सरकारच हे करू शकले कारण आत्तापर्यंतच्या सरकारांनी मुस्लीमांचे फक्त लांगुलचालन केले होते असेही कौतुक पुढे आले. ह्या प्रदेशातील मुस्लीम जनतेला आधीपासूनच जामावाने केलेल्या हिंसक जीवघेण्या हल्ल्यांची भीती होती. आज ह्या भीतीत अधिक भर पडली आहे की एखाद्या अंधाऱ्या रात्री ‘खतरनाक गुन्हेगार’ म्हणून केव्हाही आपल्यावर जीव गमावण्याची पाळी येऊ शकेल.

आमच्या या प्रेमाच्या वारीचा पुढची भेट शामली जिल्ह्यातील खुरगांव येथील एक वृध्दाच्या घरी होती. या वृध्दाने २०१३च्या दंगलीत जमावाच्या हाती आपला मुलगा गमावला होता. त्यावेळी हरयाणामध्ये कॉंग्रेसचे सरकार होते तर उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाचे सरकार होते. दु:ख आणि वेदनेने त्या वृध्दाचा चेहरा ग्रासलेला होता. त्याला आम्ही येणार असल्याचे माहित होते. तरीसुध्दा तो घाबरलेला होता व बराच वेळ तो काहीच बोलत नव्हता. आम्ही त्याला बळजबरी केली नाही. अतिशय हळुवार पध्दतीने आमचे तिथे येण्याचे कारण फक्त त्याला सांगितले. काही वेळाने त्याला भरवसा वाटला. तो रडत रडत बोलू लागला. ते रडणे एका बापाचे होते ज्याला माहीत नव्हते कि त्याच्या मुलाला कोणी मारले आणि त्याला न्याय का मिळत नाहीय. त्याचा मुलगा मोहम्मद सलीम याचे नुकतेच लग्न झाले होते. तो त्याच्या मित्रासोबत हरयाणाला कामासाठी गेला होता. हे काम कदाचित गुरांच्या व्यापाराचे होते. बातमी आली ती पोलिसांकडून नाही तर त्याच्या मित्राकडून की ९ माणसांच्या जमावाने त्याच्या मुलावर हल्ला केला होता. तो त्यांना सापडला तेव्हा तो अत्यंतगंभीर रीत्या जखमी झाला होता. त्याला घेऊन ते खाजगी इस्पिताळात गेले. पण ते त्याचा जीव वाचवू शकले नाहीत. पोलिसांनी शव विच्छेदन केले नाही. व त्याचे शव त्यांच्या ताब्यात पुरण्यासाठी दिले. राज्यातील शासनावर दबाव आल्यावर एका आठवड्याच्या कालावधीनंतर पुरलेले शव परत बाहेर काढून शव विच्छेदन केले गेले. मोहम्मदच्या वडिलांच्या शब्दात सांगायचे तर `त्यांनी कबर फाडली.' त्या वृध्दाला ह्या भावानेने अस्वस्थ केले आहे की जे घडले ते पाप झाले. त्याच्या लेकाला आता पलीकडच्या दुनियेत अडचण निर्माण होईल कारण असे कबरीतून शव बाहेर काढणे हे अपवित्र आहे. तरी त्या वृध्दाने असे करण्याला परवानगी दिली कारण त्याला वाटत होते की असे केल्याने न्याय मिळण्याच्या दृष्टीने ते पुढचे पाऊल असेल. पण पोलिसांनी आजपर्यंतशव विच्छेदानाचा रिपोर्टदेखील दिलेला नाही.

` मला फक्त कळायला हवे, माहीतव्हायला हवे की माझ्या मुलाचा मृत्यू कसा झाला.' मी खूप वाट पहिली' मी आता सहन करायचे ठरवले आहे. काय सहन करायचे? आम्ही विचार करत होतो, मुलाचा अंत एका चवताळलेल्या जमावाकडून झालेला. हे का घडले वा कसे घडले याबद्दल काही माहीत नाही. हे मान्य केले कि न्याय मिळणार नाही. आम्ही त्याला आश्वासन दिले की त्याच्या न्यायाच्या लढाईत आम्ही त्याला साथ देऊ. त्याच्या दु:खाने पार मोडून पडलेल्या अवस्थेने आम्ही व्यथित  झालो होतो.

तो म्हणाला मला कोणी मदत करणार असेल तर त्यांनी मला माझ्या लेकाच्या शव विच्छेदनाचा रिपोर्ट मला फक्त पाहायला द्यावा. जो कोणी हे करेल तो स्वर्गात जाईल.

ह्या मोडलेल्या बापाच्या आठवणी घेऊन आम्ही हरयाणातील मेवात मधल्या नूह ह्या गावी पोचलो. आमच्या घसेरा येथील तरुण यजमानाने सांगितले की आम्ही एक रात्र घसेरा गावात घालवावी कारण ह्या प्रदेशातील इतिहासाच्या दृष्टीने ह्या ठिकाणाचे फार मोठे महत्व आहे. 1947च्या फाळणीच्या दंग्यातहिदु मुस्लिमांचे रक्ताचे पाट वहात होते. मेवात मधील मिओ मुस्लीम मोठ्या संख्येने पाकिस्तानात जाण्यासाठी निघाले होते. महात्मा गांधी घासेरा गावात आले व त्यांनी मिओ मुस्लीमाना विनंती केली कि त्यांनी भारतातच रहावे. भारत हे तुमचे घर आहे. ते जेवढे हिंदूचे आहे तेवढेच इतर धर्मियांचे देखील आहे. ते पुढे म्हाणाले कि ते जर भारत सोडून गेले तर भारतामध्ये एक पोकळी निर्माण होईल. त्या नंतर एकही मिओ मुस्लीम पाकिस्तानात गेला नाही. ह्या मुळे वारीच्या उद्देशात बसणाऱ्या या गावात  वारीने एक रात्र तरी घालवायलाच हवी. आमचे एका मोठ्या जमावाने सुंदर स्वागत केले. त्या मेळाव्यात गायक व वक्ते इतिहासातल्या त्या दिवसाची आठवण करत होते. त्यांच्या पूर्वजांनी भारतात रहायचा निर्णय घेतला त्या स्मृतीजागवताना त्या मेळाव्याला एक सोहळ्याचे रुप आले होते. पण त्यांनी त्यांच्या वेदनांचे पण वर्णन केले. `एक वेगळेच वारे आपल्या देशात वाहत आहे.' एक तरुण गात होता, `मला माझ्याच देशात परके झाल्यासारखे वाटत आहे.'

आमच्या यजमानांनी जुनेदच्या आईवडिलांना बोलावले होते. जुनेद्ला जेव्हा मारहाण करून गाडीत जीवेमारले होते तेव्हा मी या घटनेनंतर त्यांना त्यांच्या घरी जावून भेटलो होतो. जुनेदची आई सायराने मला बाजूला बोलावून सांगितले की तिला माझ्या सोबत काहीतरी महत्वाचे बोलायचे आहे. ती म्हणाली, जुनेदला त्याच्या आयुष्यात काहीतरी मोठे करायचे होते. कदाचित तो मोठ्या मशिदीचा इमाम झाला असता व त्याने शुक्रवारची प्रार्थनेच्या वेळचे भाषण दिले असते. आता ते होऊ शकणार नाही. आता देखील तो काय असे मोठे काम करू शकेल या बद्दल ती विचार करत होती. आणि आता तिला उत्तर मिळाले होते. तिला त्याच्या नावे एक शाळा सुरू करायची होती. मुलींसाठी असलेल्या या शाळेत मुली इंग्लिश आणि हिंदी शिकतील आणि ही शाळा फक्त मुस्लीम मुलींसाठी नसेल तर ती हिदू आणि ख्रिश्चन मुलींसाठी देखील असेल. मला ह्या पेक्षा आधी चांगला मार्ग असेल असे वाटत नाही. जुनेद्ची आठवण म्हणून हा अगदी योग्य मार्ग आहे असे मला वाटले कारण ह्या पेक्षा सुंदर इतर कोणताही मार्ग असू शकत नाही.

## दिवस १०वा

वारीचा दहावा दिवस होता. मेवातमधील नूह जिल्ह्यातल्या काही कुटुंबांशी झालेल्या पिळवटून टाकणार्याम भेटीच. एका दिवसात पाच गावातल्या अकरा कुटुंबाना आम्ही भेट दिली. या सा-या कुटुंबांनीआपली जवळची माणसे गमावली होती आणि अजून ती त्यांच्या दु:खातून बाहेर आलेली नव्हती. या अकरा कुटुंबांची सारी हकीगत सांगायची झाली तर अनेक पानं खर्ची पडतील. ते काम नंतर जेव्हा मोठा दस्तावेज बनेल तेव्हाच होऊ शकेल.

परंतु या कुटुंबांशी झालेल्या बातचीतीनंतर एकंदर पुन्हा पुन्हा जे भयावह चित्र उभं राहतं ते मला तुमच्या समोर ठेवलंच पाहिजे. आपल्याला हे माहित आहे की जमावाने हल्ला करून मुस्लीम पुरुषांना जीवे मारल्याच्या ज्या काही घटना घडत होत्या त्यामध्ये एक साध्यर्म्य आहे. पण आता कायदा धाब्यावर बसवून धार्मिक विद्वेषातून पोलिसाच्या कडूनच असे हल्ले करून मुस्लीम पुरुष मारले जात आहेत. या प्रत्येक बाबतीत मारल्यानंतर एक गोष्ट रचली जाते, रस्त्यावरच्या अपघाताची किंवा गुन्हेगारीचा इतिहास नसलेल्या लोकांनी केलेल्या दरोडेखोरीची. गुरं वाहून नेणार-यास माणसांना जामावाने मारल्यानंतर किंवा त्यांना पोलीसांनी जवळून गोळ्या झाडून मारल्यानंतर पोलीसांच्या अहवालात असे सापडते की क्रूरपणे गुरे वाहून नेणारा एक ट्रक उलटला आणि त्यात ती माणसे ठार झाली. ज्यांचा बळी जातो त्यांच्यावरच गोरक्षा कायद्याखाली खटले भरले जातात. आणि जमातवादी हिंसक जमावावर किंवा धडाधड केव्हाही गोळीबार करणा-या पोलीसांवर काहीही कारवाई न होता ते बिनदिक्कत मोकाट फिरतात. किंवा ठार झालेल्यांना दरोडेखोर ठरवले जाते, त्यांनी पोलीसांवर गोळीबार केल्याचे सांगितले जाते (पोलिसांना कोणतीही इजा झालेली नसते), अगदी असाच प्रकार एक दिवसांपूर्वी आपण योगी आदित्यनाथांच्या उत्तर प्रदेशात घडताना पाहिला.

ही कुटुंबे हृदय पिळवटून टकणा-या संपूर्ण निराशेच्या गर्तेत असलेली आम्हाला आढळली. त्यांना न्याय मिळण्याची काडीचीही आशा नव्हती. बहुतेक कुटुंबांनी न्याय मागण्याच्या मागे लागायचे नाही असाच निर्णय घेतलेला होता. काहींनी तर तक्रारदेखील केली नाही. काही थोड्याजणांनी दु:ख आणि संतापाच्या आवेगात आम्हाला सांगितले की सध्याच्या राजवटीत पोलीस आणि जमाव यांना मुस्लिमांना मारण्याचे पूर्ण स्वातंत्र्य कसे आहे. एक दलितही मारला गेला होता कारण तो त्याच्या मुस्लिम मित्राच्या गाडीत होता; त्याचे वडील दलित आणि मुस्लिमांच्या मध्ये असलेल्या भवबंधा बद्दल बोलले.

आणि सर्वात महत्त्वाचे, शोकमग्न आई-वडिल , विधवा , आणि अनाथ मुले अशी कुटुंबामागून कुटुंबे आम्हाला भेटली, ज्यांना फक्त जमावाने जे केले ते तर पचवता येत नव्हतेच, पण सारी सरकारी यंत्रणा केवळ त्यांच्या धर्मामुळे त्यांच्यावर उघडपणे विष ओकत आहे, त्यांचा तिरस्कार करते आहे हेही पचवता येत नव्हते.

त्याच दिवशी ही बातमीही आली की पेहलू खानला जिथे जामावाने ठार केले त्या बेहरोर नाक्याला वारी भेट देणार आहे याबद्दल संताप व विरोध जमा होऊ लागला आहे. वारीने ठरवले होते की दुस-या दिवशी तो जिथे ठार झाला त्या जागी जाऊन त्याच्या आणि त्याच्यासारखे जे हिंसक द्वेषाचे बळी झाले होते त्यांच्या नावेतिथे फुले वाहायची. विश्व हिंदुपरिषद , हिंदु जागरण मंच आणि बजरंग दल यांनी घोषंणा केली होती की ते वारिला बेहरोरमध्ये शिरू देणार नाहीत व हत्येच्या जागी फुले वाहू द्णार नाहीत. स्थानिक संघटकांना सांगण्यात आले की जर आम्ही तसा प्रयत्न केला तर आमचे स्वागत लाठ्या-काठ्यांनी होईल. ज्या हॉलमध्ये आम्ही आधी शांतता सभा घेणर होतो त्यांनी आम्हाला जागा नाकारली आणि दुसरा कुठला हॉलही मिळेना.

वारीमध्ये आम्ही असा निर्णय घेतला की कितीही जमावाचा विरोध होवो, आपण बेहरोरला जाऊन पेहलू खानची स्मृती जागवायची. जेव्हा आम्ही अलवरला रात्रीच्या मुक्कामाला पोचलो तेव्हा पोलीस व प्रशासनातील वरिष्ठांनी आम्हाला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. आम्ही नम्रपणे पण ठामपणे नकार

दिला आणि सांगितले की आम्ही बेहरोरच्या पोलिस ठाण्यात जाऊ, पेहलू खानच्या मृत्युपूर्व जबानीत ज्यांची नावे घेतली होती त्यांना पोलिसांनी सोडून दिले आणि उलट पेहलू खान व त्याच्या मुलांनाच गुन्हेगार ठरवले यामुळे आमचा मोठा अपेक्षाभंग झाला आहे ते सांगू आणि पेहलू खानला जिथे ठार मरण्यात आले तिथे फुले वाहू. पोलीस अधिकार्यांनी आम्हाला सांगितले की यापूर्वी अशा  गोष्टींसाठी कुणालाही परवानगी दिलेली नव्हती. आम्ही त्यांना म्हटले की, जी वारी हिंसक द्वेषामुळे ज्यांना ठार मारण्यात आलं त्यांच्या कुटुंबीयांना थोडासा दिलासा द्यायला आणि ठार झालेल्या माणसाच्या स्मृतीत फुले वाहणार आहे त्यांना प्रशासन कोणत्या कारणामुळे थांबवू शकते?

## दिवस ११वा

वारीचा अकरावा दिवस अनपेक्षित विरोधाचा आणि ताणतणावाचा दिवस ठरला.

अलवरच्या जिल्हा प्रशासनाने पुन्हा आम्हाला पटवण्याचा भरपूर प्रयत्न केला की आम्ही बेहरोरला पेहलू खानला जिथे महामार्गावर ठार करण्यात आले त्या जागेला भेट देणे टाळावे. माझी एक विनंती होती की आम्हाला बेहरोरला पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीसांना पेहलू खानला जमावाने ठार केल्याच्या केसबद्दल काही कठिण प्रश्न विचारायचे आहेत, ती त्यांनी मान्य केली. परंतु जिथे पेहलू खानला हिंसक जमावाने ठार केले त्या ठिकाणी फुले वाहण्याबाबत मात्र ते अडून होते. जिल्ह्याच्या अधिका-यानी सांगितले की तिथे अम्हाला थोपवण्यासाठी दगड्फेकीच्या इराद्याने खूप लोक जमले आहेत. मीत्यांना सांगितले की आम्ही असे मानतो की आमची ही पप्रेम आणि दिलासा देण्याची छोटीशी मोहीम एखाद्या जामावाला हिंसेने थांबवू देणं योग्य होणार नाही.

आम्ही मग वारीत ही चर्चा केली. पेहलू खानला ज्या जागी ठार केलं त्याजागी फुले वाहू न देण्याचा जो प्रशासनाचा आदेश होता तो धुडकावला पाहिजे याबद्दल एकमत होतं परंतु  मी त्यावेळी म्हणालो की आपल्या बसवर दगडफेक होण्याचा धोका वगळता, वारीतील इतरांनी कोणताही धोका पत्करावा हे मला मान्य नव्हते. त्यामेळे मी असा आग्रह धरला की इतर सर्वांनी बसमध्ये बसून राहावे आणि मी एकट्याने जाऊन वारीतर्फे पेहलू खानच्या स्मृतीला फुले वाहावीत.

वारीतल्या माझ्या सहप्रवाशांमध्ये ताण होता पण उत्साह व निर्धारही होता. वारीतील सर्वात ज्येष्ठ वारकरी, जॉन दयाल, यांनी अशी भूमिका घेण्यामागचे नैतिक महत्त्व भावपूर्णतेने विशद केले. आम्ही पोलीस स्टेशनला पोचण्याच्या आधी, बरोद गावच्या गावकऱ्यांच्या एका छोट्या गटाने आमचा रस्ता रोखला. आम्हाला असे आढळले की हा जमाव घोषणांनी, हार-तुऱ्यांनी आणि गरम-गरम चहाने आमचे स्वागत करण्यासाठी सकाळी-सकाळीच जमला होता. त्या संकटप्रसंगी त्यांची ही कृती आम्हाला मोठा दिलासा देणारी होती. त्यांच्या हिंदु सरपंचासकट त्यांनी तिथे उत्स्फूर्त आणि जोशपूर्ण भाषणे केली आणि आपल्यात फूट पाडणाऱ्या द्वेषाच्या राजकारणाला विरोध करण्याचे महत्त्व काय ते मांडले.

आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. आमच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी अतिरिक्त पोलीस निरीक्षक आणि अतिरिक्त जिल्हा मॅजिस्ट्रेट हजर होते. त्यांनी सांगितले की पेहलू खानच्या मृत्यूपूर्व जबानीत ज्यांची नावे होती त्यांच्या विरुद्धची केस बंद करण्याचा निर्णय हा राज्य सी.आय.डी चा होता व त्याबद्दल ते काही सांगू शकत नाहीत. परंतु मी त्यांना म्हटले की ज्यांना एका जमावाने ठार केले त्या बळी गेलेल्या व्यक्तींविरुद्ध तर फौजदारी गुन्हे स्थानिक पोलीसांनीच दाखल केले.ज्यांचा बळी जातो त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी पोलीसांची आहे मग असे असताना तुम्ही त्यांचा विश्वासघात कसा काय केलात?? यावर त्यांच्याकडे काही उत्तर नव्हते.

आम्ही पोलीस स्टेशनमधून बाहेर आल्यावर पुन्हा पोलिसांनी केवळ शे-दोनशे यार्डावर असलेल्या त्या जागेवर जाऊन फुले वाहण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की दगड-काठ्या घेऊन एक संतप्त जमाव जमा झालेला आहे व ते मला इजा करतील. मी म्हटले की मी त्याला तयार आहे आणि मी मागे हटणार नाही.मी असेही म्हटले की मला माझ्या सहप्रावाशांना इजा होऊ नये असे वाटते म्हणून मी एकटाच फुले वाहणार आहे. पोलीसांना मी सांगितले की जिल्हाधिकारी म्हणून माझ्या इतक्या वार्षांच्या कारकीर्दीच्या आधारे मी निश्चित सांगू शकतो की दगड घेऊन जमा झालेल्या जमावाला आवर घालून त्यांना विखुरणं हे पोलीसांना सहज करता येण्यासारखं आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी रागाने म्हणाला की त्यांनाही निषेध करण्याचा अधिकार आहेच. मी म्हटले की मला माहित नाही की हिंसेने निषेध करण्याचा अधिकार संविधान देते की नाही. पण तुम्हाला तसे वाटत असेल तरी मला निदान हातातल्या फुलांशिवाय काहीही न घेता निषेध करण्याचा संवैधानिक हक्क मला जरूरआहे.

मी ठिकाणाकडे जाऊ लागलो पण पोलीस मला समक्ष आडवे आले. मग मी तिथेच जमिनीवर बसलो व उत्स्फुर्त धरणे सुरु केले. त्यांनी मला फुले वाहायला जाऊ तरी द्यावे नाही तर मला अटक तरी करावी. त्यांची आपापसात चर्चा चालू असताना सुमारे अर्धा तास मी ठिय्या मारून होतो.

शेवटी त्यांनी परवानगी दिली.

दोन मुठी झेंडूची फुलं घेऊन काही पोलीसांच्या गराड्यात जिथे एका जामावाने क्रूरपणे पेहलू खानला ठार केले होते त्या ठिकाणापर्यंतची शे-दोनशे पावले मी चाललो. ती रस्त्याशेजारची घाणेरडी सर्वसामान्य जागा होती. मी तिथे गुढगे टेकले आणि म्हणालो, माझी देवावर श्रद्धा नाही त्यामुळे मी प्रार्थना करू शकत नाही. पण माझा माणूसपणावर आणि न्यायावर विश्वास आहे. त्यामुळे माणूसपणा आणि न्याय यांच्या नावे मी ही फुलं इथे ठेवतो. फक्त पेहलू खानच्या स्मृतीसाठी नाही, तर त्याच्याप्रमाणेच आपल्या या देशातील त्या शेकडोंसाठी ज्यांचा हिसक द्वेषाने बळी घेतलेला आहे.

मी बसकडे  परत आलो आणि पोलिसांनी आम्हाला घाईघईने बसमध्ये कोंबले. त्यांच्यासमोरून जाता जाता जमावाने काही दगड आमच्या बसवर फेकले.

वाटेत कोठपुतली या छोट्या गावातील लोकांनी वारीचे स्वागत योजले होते. पण तिथे पोलिसांच्या देखतच एक तरुणांचा गट आला व त्याने बॅनर फाडले आणि फुले फेकून दिली. पोलीस म्हणाले की जमावाला थांबवण्यास ते असमर्थ आहेत. पोलीसांनी मग फक्त दोन संघटकांना पोलीस स्टेशन समोर बसला भेट द्यायची परवानगी दिली. मी आणि माझे काही सहकारी बाहेर आलो. पोलीसांनी सांगितले की आमच्याकडे फक्त दोन-तीन मिनिटेच आहेत आमच्या स्वागताला आलेल्यांनी आम्हाला नाश्त्याची

पाकिटे दिली. इतक्यात आणखी काही माणसे जमली आणि बस जाता जाता त्यांनी आपले बूटकाढूनआमच्यावर फेकण्याची तयारी केली होती.

वारीला आता पोलीस ताफा मिळाला होता. एक बसच्या पुढे आणि एक मागे. या ताफ्याशिवाय आता वारीला राजस्थानमध्ये प्रवास करण्याची परवानगी नव्हती. किती दु:खाचा दिवस होता, एका प्रेमाच्या वारीला पोलीस संरक्षणशिवाय प्रवास करता येत नव्हता. आम्हाला पोलीस संरक्षणाची इच्छाहीनव्हती आणि गरजही नव्हती. पोलीस संरक्षणाची गरज होती त्या शोकमग्न कुटुंबांना ज्यांना आम्ही दररोज भेटत होतो आणि त्या बाबतीत मात्र पूर्ण अपयशच होतं.

## दिवस १२ वा

राजस्थान मधील पहिल्या दिवशी बहोर येथे ज्या टिकाणी पहेलूखानाला जमावाने दगड व काठ्यां व चपलांनी मारून ठार केले होते तेथे वारीचे स्वागत दगडफेकीने झाले. राजस्थानभेटी मधल्या दुसऱ्या दिवशी आम्ही अजमेरला गेलो आणि तिथे आमच्यावर गुलाबाच्या पाकळ्यांचा वर्षाव केला गेला. आम्ही गजबजलेल्या रस्त्यावर शेकडो लोक शांतता व प्रेमाची गाणी गात, लोकांच्या एकजुटीसाठी आणि द्वेषाच्या विरोधात घोषणा देत चालत होतो. वारीमध्ये खूप मोठ्या संख्येने लोक सामील झाले. स्थानिक गुरुद्वाराने आमचे स्वागत केले. अनेक ख्रिश्चन धर्मगुरू व नन्सपण सामील झाल्या. आम्ही चालत होतो आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेले लोक आमच्यावर फुले उधळत होते. काहीजण `अमन अमन अमन अमन' असा घोष करत होते. वारी मोईनुद्दिन चीस्तीच्या दर्ग्यासमोर समाप्त झाली. त्या ठिकाणी दर्ग्याच्या सर्वात ज्येष्ठ विश्वस्तांनी आमचे स्वागत केले. ते प्रेम आणि कृपा आणि करुणा या बद्दल बोलत असताना आमच्या डोक्यावर गुलाब पाकळ्यांचा वर्षाव होत होता. आणि ही वारी एका सूफी संताच्या दर्ग्याच्या दारात येऊन तिची सांगता होणे हे अगदी योग्य होते कारण ह्या सूफी संताने सर्व मानव हे समान आहेत आणि प्रेम हे पराकोटीचे  महत्वाचे आहे असे कायम मानले होते.

सकाळ मात्र जरा दु:खी होती. आम्ही नगौर जिल्ह्यातील डांगवास या गावी गेलो. ह्या गावात ५ दलितांची व एका बिगर दलिताचीजाट जमीनदारांनी निर्घृण हत्या केली होती. ४० वर्षापूर्वी एका दलित कुटुंबांनी १५०० रुपयांसाठी आपली जमीन गहाण टाकली होती. पैशांची परत फेड केल्यानंतर सुध्दा जमीनदार जमीन परत द्यायला तयार नव्हता. त्या दलितांनी कोर्टात जाऊन दीर्घ व खर्चिक लढा देऊन तो जिंकला पण तरी ते जाट जमीन परत द्यायला तयार नव्हते. दलितांनी गावातील पंचायतीकडे तक्रार केली. पंचायतीने देखील दलितांची जमीन त्यांना दिली नाही. अखेर दलित कुटुंबांनी जमीन ताब्यात घेतली व त्या जमिनीवर घर बांधले. व ती जमीन कसायला सुरवात केली. त्या ठिकाणी ते फक्त ३२ दिवस जिवंत राहिले.

१४ मे २०१५च्या दिवशी जाट पुरुष दगड, सुरे, व बंदुका घेऊन शेतात पोचले व दलित पुरुषांना मारून त्यांच्या अंगावरून ट्रक्टर फिरवायला लागले. आम्ही त्या दु:खाने हरलेल्या माणसांना भेटायला गेलो. कुणी मुलगे, कुणी वडील, नवरे, भाऊ गमावले होते. त्यांनी त्या सकाळच्या घटनांचे हृदयाद्रावक वर्णन केले. त्या दलित बायकांना पण ओढत नेले होते. त्यांचे कपडे फेडले होते. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार

केले होते. त्यांच्या योनीत काठ्या देखील खुपसल्या होत्या. काही स्त्रियांनी बचावासाठी छपरावरधाव घेतली.पण त्या हल्लेखोरांनी त्यांचे ट्रक्टर घरावर घातले. आणि घराचे छप्पर कोसळले. त्यांच्यापैकी तीन जण जागच्या जागी ठार झाले आणि दोघे हॉस्पिटलमध्ये मेले. हल्लेखोरांनी त्या ठिकाणी मेलेल्या लोकांच्या शरीरावर देखील अत्याचार केले. त्यांचे डोळे काढले, पाय छाटले. खंजिराने, चाबकाने आणि इतर तऱ्हेच्या हत्याराने जखमी झालेल्या अनेक जणांना इस्पितळात उपचारासाठी नेले. पण संतापलेले जाट इस्पितळात घुसलेव त्या ठिकाणी जाऊन त्यांना ठार मारायचा त्यांनी प्रयत्न केला.

पोलिसांनी आपली भूमिका नेहमी सारखीच निभावली. पोलिसांनी त्यांचे मोबाईल फोन बंद करून टाकले. आणि ते गुन्ह्याच्या जागी दोन तासांनी पोचले. त्यांनी त्या बिगर दलित माणसाला मारल्याचा गुन्हा नोंदवला. त्या आधारे या गुन्ह्याची नोंद दलितांवर झालेला अत्याचार म्हणून न करता जमिनीवरून झालेला वादाचा बळी म्हणून केली. पण स्थानिक लोक गप्प बसले नाहीत. त्यांच्या बरोबरीने राजस्थानमधील दलित संघटनांनी साथ दिली.दीर्घ लढ्यानंतर ह्या घटनेचे तपास करण्याचे काम सीबीआय कडे सोपवण्यात आले. सीबीआयने दलितांवरचे गुन्हे काढून घेतले. पण या घटनेत पोलिसांनी गुन्हेगारांनाच साथ दिली याची त्यांनी दखल घेतली नाही. उच्च जाती एकत्र आल्या व त्यांनी दलितांवर बहिष्कार टाकला. त्यामुळे गावात दलितांना आता काम नाही. इतर दलितवा मुस्लीम देखील या दलितांना मदत करण्यास कचरतात व त्यांना पाठिंबा देत नाहीत. पण आम्हाला दिसले की ते मोडलेले नाहीत. ते ह्या जातीय हल्ल्यांनी दबलेले  व तिरस्कारापुढे झुकलेले नाहीत. त्यांनी ह्या वारीला आमंत्रण देण्याचे मोठे धाडस दाखवले असे आम्हाला वाटले. आणि त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराच्या या घटनेला भर सभेत वाचा फोडायला पण ते डगमगले नाहीत. त्या सभेत स्त्रिया देखील त्वेषाने बोलल्या व त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराच्या घटना त्यांनी जाहीरपणे मांडल्या.

संध्याकाळी आम्ही केकरी या भिलवाडातील गावाला गेलो. या ठिकाणी आलेला तिरस्काराचा अनुभव खूपच वेगळा होता. येथे एका स्त्रीची निर्घृण हत्या केली गेली होती. त्या स्त्रीला डाकिन वा चेटकीण ठरवून मारण्यात आले होते. त्या बाईचा दारुडा नवरा मेला होता आणि त्याचा दुखवटा साजरा होत असताना त्याचा मोठा भाऊ पण मेला. त्यांच्या राखेचे विसर्जन करून घरी आल्यावर त्या बाईच्या नवऱ्याची २५ वर्षाची भाची व दुसरी त्याच वयाची नातेवाईक यांच्या अंगात भेरुजी आले. त्या दोघींनी सांगितले की हीविधवाबाई चेटकीण आहे. त्या चेटकिणीला वठणीवर आणण्यासाठी तिने माणसाची विष्ठा खायला हवी. तिच्या पायावर, तळहातावर व डोळ्यांवरजळते कोळसे ठेवावेत. तिला नंगे करून घराबाहेर धावायलालावावे. . ती शरमेने व वेदनेने ओरडली तरी त्या दोघी अंगात आलेल्यांनी व काही पुरुषांनी त्या बाईला दाबून धरून त्या सर्व गोष्टी करायला लावल्या. तिला आपला चेहरा जळत्या कोळशात खुपसावा लागला. त्या बाईच्या चौदा-पंधरा वर्षाच्या मुलाला ते आपल्या आईचे हाल पहावले नाहीत, तिचे नग्न रूप त्याला सहन झाले नाही व त्याने खोलीत घुसून स्वत:ला बंद केलेव स्वत;ला पांघरुणात लपेटून घेतले. कोणीही शेजारी मध्ये पडले नाहीत. दुसऱ्या दिवशी ती मेली. गावाने तिला भल्या पहाटे जाळले. पोलिसांना न कळवता त्यांनी हे केले. गांव पंचायत बसली व त्यांनी २५०० रुपयाचा दंड तिला मारणाऱ्यांवर बसवला आणि त्यांना पुष्कर वर स्नान करायला सांगितले व एवढ्या माफक दंडावर गुन्हा माफ केला. या ठिकाणी प्रकरण संपले असते. पण एका शिकलेल्या धाडसी नातेवाईकाला हा अघोरी प्रकार कळला तेव्हा त्यानेइतर नातेवाईकांचा राग पत्करून आणि वाळीत टाकायच्या धमक्यांना न घाबरता पोलिसांकडे तक्रार केली. पोलीस पाच दिवस गप्प बसले. पण

स्थानिक स्त्रियांच्या गटांनी केलेल्या निषेधामुळे त्यांनी दहा दिवसानंतर गुन्हा नोंदवला. त्या स्त्रीचे खुनी आज तुरुंगात आहेत पण त्यांना अजिबात पश्चाताप वाटत नाही वा असे कृत्य केल्याची शरमेची अपराधाची भावना नाही.

आम्ही त्या स्त्रीच्या कुमारवयीन मुलाशी बोललो. अजूनही तो त्या थरकाप उडवणा-या घटनेच्या धक्क्यातून सावरलेला नाही. तो म्हणाला त्याला आमच्याशी त्याच्या आईच्या मृत्यूबद्दल बोलायचे आहे पण तो बोलताना भावनाशून्य निर्विकार एकसुरी आवाजात बोलत होता.

अशा प्रकारच्या द्वेषातूनहोणाऱ्या अत्याचाराचे बळी फक्त अल्पसंख्यांक व दलित नाहीत. त्यामध्ये एकट्या राहणाऱ्या, गरीब वंचित व खालच्या जातीच्यास्त्रियांचाही समावेश आहे हे या घटनेने आमच्या लक्षात आणून दिले. ज्या निर्घृण रीत्या तिला मारण्यात आले तो प्रकार मध्ययुगात शोभणारा आहे. त्या प्रकारात दिसणारा अंधविश्वास व स्त्रीविरोधपाहून आम्ही सर्व आतून हादारलो होतो व अवाक झालो होतो.

## दिवस १३ वा

आम्ही भिलवाडा येथे रात्री उशिरा पोचलो. वारीतील इतर सर्व आदल्या रात्रीच पोचले होते. खूप सारे लोक आमची वाट पहात होते. पण आम्ही रात्री १० वाजता पोचलो. त्यांनी आम्हाला भिलवाडातील वाढत्या सांप्रदायिक वातावरणाबद्दल सांगितले. दिवसाची सुरवात छोटयाशा वारीने भिलावाडातील रस्त्यावर झाली. वारीची समाप्ती डॉक्टर आंबेडकरांच्या पुतळ्यापाशी झाली. त्या ठिकाणी आम्ही डॉक्टर आंबेडकरांच्या शिकवणीतील बंधु व भगिनी भावाची कल्पना ही आपल्या संविधानातील लोकशाही मूल्यांच्या मुलभूत अधिकारातील आहे या वर जोर दिला. तेथून आम्ही उदयपुरला गेलो. त्या ठिकाणी पुन्हा एकदा अनेक नागरिक वारीच्या स्वागतासाठी आले.

आम्ही जेवण करून गुजराथ कडे निघालो. राजस्थानला लागून कोटधागडी या साबरकांठा जिल्हयातील गावी पोचलो. चार महिन्यापूर्वी या ठिकाणी खूप क्रूर अशी घटना बिचा-या गाईच्या नावाने झालेली होती.

पोलिसांच्या सांगण्यानुसार २ मे २०१७ या दिवशी त्यांना गावात गाय मेली आहे अशी बातमी मिळाली. पोलीसांनी नोंदवलेल्या घटनेत असे म्हटले आहे की बातमी कळताच ते घटनास्थळी पोचले तेव्हा पांच जण एका नुकत्याच कापलेल्या बैलापाशी बसलेले आढळले. त्यांच्या प्रथम अहवाला प्रमाणे बैल गाईच्या वंशातील आहेत. ह्या अहवालात सविस्तर, चित्रस्वरूपात दिल्यासारखे वर्णन अनेक पाने खर्चून नोंदवले आहे. त्या मारलेल्या बैलाच्या मानेवर मोठी चाकुची जखम आहे, त्याची शिंगे तोडलेली आहेत. त्याच्या शरीराचे दोन तुकडे केलेले आहेत. त्याच्या अर्ध्या शरीरावरची कातडी सोललेली आहे. सुकलेले रक्त सर्वत्र पसरले आहे. त्या मेलेल्या बैलाच्या बाजूला एक तराजू, कुऱ्हाड व सूऱ्या पडलेल्या आहेत. चार लोक पाठलाग केला असता पळाले..

पोलीसांनी एका दलिताला पकडले. त्याचे नाव लेबाभाई भांबीभाई. त्याला अटक केली. त्याचा गुन्हा गोहत्या असा होता. लेबाभाई विनवत राहीला की त्याने बैलाला मारले नाही. तो गाईच्या मांसाचा वा गाई विकण्याच्या व्यापार करत नाही. लहान असल्यापासून मेलेले जनावर सोलायचा त्याच्या जातीचा व्यवसाय करतो.. त्या दिवशी मेलेल्या बैलाचे तो कातडे सोलत होता. पण पोलीस म्हणत राहिले कि तो खोटे बोलतोय. आणि पोलिसांनी त्याला बेदम मारले.त्याने नंतर कोर्टात सांगितले कि पोलीस त्याच्याकडे दोन लाख रुपये मागत होते. ते घेऊन त्यांनी त्याला जीवदान दिले असते व त्याला सोडले असते. त्याचे कुटुंबीय १ लाख रुपयेच उभे करू शकले पण अर्थातच ते पुरेसे नव्हते.

त्यानंतर त्यांनी ५५ वर्षाचा आदिवासी शेतकरी कोदारभाई गमार व दोन मुस्लीम पुरुष, इमामभाई व शाबिरभाई यांना पकडले. त्या तिघांना पोलिसांनी दयामाया न दाखवता बेदम मारले. कोदारभाईं ह्या माराने मेले.

आम्ही कोदारभाईच्या विधवेला, शान्ताबेनना, त्यांच्या मातीच्या छोटयाशा घरात भेटलो. त्या दिवशी त्यांचा नवरा आपल्या शेतात झोपला होता. सकाळी अर्धा डझन पोलीस त्याला मारत घरात घेऊन आले. ती किंचाळली, विनंत्या करत राहिली की त्याला सोडा. पोलिसांनी तिचा हात जोरात खेचला आणि तिला सांगितले की नवऱ्याच्या चेहऱ्याकडे शेवटचे एकदा पाहून घे. तिने त्याच्या सरणाच्या तयारीला लागावे.

एवढे बोलून त्यांनी त्याला घराबाहेर खेचून नेले व दयामाया न दाखवता पट्ट्यांनी व दांड्यांनी मारत गावाच्या मुख्य केंद्राकडे नेले. तिच्या मोठ्या, वयात आलेल्या मुलांनी व इतर गावकऱ्यानी सांगितले की त्याला पोलिसांनी एवढे मारले की त्याला परसाकडे झाले व त्याचे कपडे लघवीने ओले झाले होते. ते त्याला गाडीत घालून २० किलोमिटर वरच्या दुसऱ्या गावाला घेऊन गेले. त्या गावाच्या चौकात त्याला पुन्हा एकदा बेदम मारले. हे असे लोकांसमोर मारण्याचे कारण हे गाईला मारण्याचा गुन्हा केल्यास कशी शिक्षा होते हे पाहून लोकांना दहशत बसावी म्हणून मुद्दाम घडवून आणण्यात आले असावे. हे क्रौर्याचे जाहीर प्रदर्शन हे धर्मिक तिरस्काराने जमावाने एखाद्याला जीवे मारण्यासारखेच होते. ह्या जीवे मारण्याच्या प्रकारात फरक एवढाच होता की हे गणवेशातील लोकांनी राजरोसपणे केलेले होते!त्या नंतर पोलिसांनी त्याला चौकीत नेले. त्या संध्याकाळी कोदारभाईनी आपल्या शेजाऱ्यांना पोलीस स्टेशन मधून फोन केला व मुलाला बोलवायला सांगितले. मुलाशी बोलताना ते रडत होते. `मला एवढे बेदम मारले आहे कि मी चालू शकत नाही. मला आजारी वाटते आहे. त्यांनी मला पट्ट्यांनी डोक्यावर मारले आहे. ते म्हणतात आपण त्यांना ४ लाख रुपये दिले तर ते मला मोकळे सोडतील. आपली जमीन गहाण ठेव आणि ते पैसे घेऊन पोलीस स्टेशनाला ताबडतोबये. तू तसे केले नाहीस तर मी काही आता जिवंत रहात नाही. '

त्याच्या मुलांनी लागलीच शेजारच्या श्रीमंत माणसाकडे जमीन गहाण ठेवायची तयारी सुरु केली. पण दुसऱ्या दिवशी शेजाऱ्याला आणखी एक फोन आला कि कोदारभाइंना अहमदाबादच्या इस्पितळात ठेवले आहे. गावकऱ्यांनी टक्सी केली व ते इस्पितळात पोचले. तेथे त्यांची अवस्था गंभीर होती व सर्वत्र नळ्या लावलेल्या होत्या. दुसऱ्या दिवशी ते वारले.

शांताबेननी आम्हाला ही गोष्ट पुन्हा एकदा सांगितली. त्यांच्या नवऱ्याने कधीच गाईला मारले वा तिचे कातडे सोलले नव्हते. त्यांचेकडे दोन स्थानिक जातीच्या गाई होत्या. त्या गाई त्यांच्या चहा पुरते दुध

द्यायच्या. ते शेतात काम करायचे. आणि इतर वेळी मजूर म्हणून कामाला जायचे. तिला हे कळलेच नाही कीपोलिसांनी त्याला गाय मारली या आरोपाखाली  कशाला अटक केली. व त्याला गाय मारली नसताना का म्हणून ठार मारले. तिच्या नवऱ्याने ११ मुले मागे ठेवली आहेत. सर्वात लहान मूल ५ वर्षाचे आहे. आणि मोठा ३० च्या जवळपास वयाचा आहे. ती एकटी ह्या सर्व मुलांना कसे मोठे करणार, त्यांचे संगोपन कसे करणार हे तिला कळत नाहीय.

आमचे जीवन आणि आमच्या आयुष्याची किंमत ही गाईं पेक्षा कमी आहे. ती रडत होती. आमचे आयुष्य हे कुत्र्याच्या आयुष्यासारखे आहे.

नैतिकतेचा हा प्रहसनगर्भ उपहास आहे. एक आदिवासी, एक दलित आणि दोन मुस्लीम सर्वावर पोलिसांनी गाईला मारले म्हणून गुन्हा नोंदवला आहे. आणि ती गाय नव्हतीच तर एक बैल होता. सर्वांना बेदम मारले आणि जिवंत रहाण्यासाठी पैसे मागितले. रक्ताची किंमत केली. एकाला अपमानीत केले गेले आणि सर्वासमक्ष त्याची मानहानी केली व बेदम मारहाण केली जे कीजमावाने जीवे मारण्या इतकेच भयानकआहे. अखेर त्यापैकी एक जण मरणपावला.

खरंच आपला देश असा झाला आहे की आपल्या देशात आदिवासी, दलित, आणि मुस्लीम यांचे जीवन हे गाईच्या तुलनेत कमी किंमतीचे आहे.

## दिवस १४ वा

प्रेमाच्या वारीचा शेवट सुरु झाला. अखेरचे काही दिवसच उरले. वारकरी आता दमलेत आणि दुःखित आहेत कारण ते शरीराने आणि मनाने थकले आहेत. एवढ्या एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पसरलेल्या द्वेष आणि  तिरस्कारातून केलेल्या गुन्हयाच्या हकीकती, क्रौर्य, शोषणऐकून जास्तच थकवा आलेला आहे.तिरस्कारातून केलेल्या गुन्हयाच्या या केवळ हकीकती ऐकून जर आपण एवढे हताश झालो आहोत तर जे लोक  हे रोज अनुभवतात, सहन करतात आणि ज्यांचे जिवलग अशा हल्ल्यात मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्यासाठीतिरस्कारातून केल्या गेलेल्या खुनाच्या घटना व गुन्हेगारांना पाठिंबा व प्रोत्साहन देणारी शासन व्यवस्था हे सारे वास्तव किती भयानक आहे याची आपण जाणीव ठेवायला हवी.

आज वारी मोहम्मद आयूब ह्या ऑटो रिक्षा चालकाच्या कुटुंबियांना भेटायला गेली. गोरक्षकांच्या जमावाने त्याला एक वर्षापूर्वीजीवे मारले होते. आम्ही त्यांना भेटायला आलो त्याच्या आदल्या दिवशीच त्याची पुण्यतिथी साजरी केली होती. ते दोघे भाऊ होते. आयुब हा मोठा. त्यांचे वडील हे दारुडे होते. आणि ते घरापासून दूररहात होते. मुलांच्या पालन पोषणासाठीचा खर्च ते पहातच नव्हते. त्यांच्या आईने मुलांना अपार कष्ट करून वाढवले. ती मोलकरीण  होती. या दोन मुलांनी शाळा सोडली. आईला व बहिणीला मदत व्हावी हा त्यामागचा उद्देश होता. आयुबचे लग्न झालेले होते व त्याला दोन मुले आहेत.

गेल्या वर्षीच्या बकरी ईदच्या आधी त्याने आपल्या कुटुंबासाठी जास्तीचा पैसा मिळवण्याचे ठरवले. त्यासाठी त्याने शेजारच्या राजस्थानमधून जनावरे वाहण्याचे काम करायचे ठरवले. ते राजस्थानमधून काही गुरे घेऊन येत होते. त्यावेळी एक ८ जणांच्या गोरक्षकांच्या गटाने त्यांचा पाठलाग सुरु केला. ते गाड्यांवर व मोटार सायकल वर होते. आयुबने वेग वाढवला. पण गोरक्षकांनी त्यांना गाठले व त्यांच्या पुढे जावून त्यांचा महामार्गावर रस्ता आडवला. चालक व गुरे चढवणाऱ्यांनी पळ काढला. पण गोरक्षकांनी आयुबलापकडले. ते त्याच्या अंगावर धावून गेले, तो बेशुध्द होईपर्यंत त्याला मारले. . त्यानंतर त्यांनी त्याला रस्त्याच्या मधोमध ठेवले. त्यांना आशा होती कि एखादी गाडी येऊन त्याला चिरडेल आणि त्याचा मृत्यू हा गाडीखाली येऊन झाला, जमावाने केलेल्या मारझोडीने नाही असे सिद्ध होईल.

सुदैवाने एका टेहळणी करणाऱ्या पोलिसाने त्याला पाहिले. आणि त्याला इस्पितळात दाखल केले. त्याच्या कुटुंबीयांनी त्याचा इस्पितळातील फोटो दाखवला. त्याच्या चेहरा व प्रत्येक अवयव हा ठेचल्यासारखा सारखा दिसत होता. त्याने मरण्यापूर्वी तीन दिवस संघर्ष केला.

आम्ही भेट दिलेल्या प्रत्येक राज्यात हा जवळजवळ नियमच असल्यासारखे पोलिसांनी ज्याच्यावर अन्याय झालाय त्या याकुब वरच राज्यातीलगाईला मारण्याच्या कडक कायद्याचा भंग केला म्हणून प्रथम गुन्हा दाखलकेला. . दुसरा घटना अहवाल म्हणून त्याने वाहन वेगात चालवलेहा ठपका ठेऊन गुन्हा दाकल केला. . तिस-या अहवालनुसार त्यांनी हा अनोळखी जमावावर आयुबवर हल्ला कल्याबद्दल गुन्हा नोंदवल. . पण कुटुंबीयांनी व मानव हक्क संरक्षण कार्यकर्त्यांनी महामार्गावरील दुकानातील व घरांमधील सिसिटीव्ही कॅमेरामध्ये पाहिले आहे की गोरक्षकांचे चेहेरे स्पष्ट दिसत आहेत आणि ते ओळखीचे चेहरे आहेत.

तो इस्पितळात मेल्यानंतर त्याच्या जमातीच्या वरिष्ठ लोकांनी हजार पेक्षा जास्त लोकांना जमा केले व इस्पितळाला घेरले. जो पर्यंत आयुबच्या पहिला घटना अहवालामध्ये त्याचा मृत्यू हा जमावाने केलेल्या जीवघेण्या मारहाणीने झाला आणि हा जीव घेणारा जमाव अनोळखी जमाव नव्हता तर एका ठरवून आलेल्या गोरक्षकांच्या छोट्या जमावाने त्याचा जीव घेतला अशा नोंदी होत नाही तोपर्यंत त्यांनी आयुबचे प्रेत ताब्यात घ्यायला नकार दिला.त्यांनी हा निषेध नोंदवला कारण अनेक सीसीटीव्ही कॅमेरे आजुबाजुला आहेत व त्यामध्ये गोरक्षकांचे चेहरे स्पष्ट पहाता येत आहेत. व आयुबच्या कुटुंबीयांचे हितचिंतकांनी त्यांचे चेहरे ओळखले आहेत. पोलिसांनी जेवढे लांबवता येईल तेवढे लांबवण्याचा प्रयत्न केला. पण निषेध करणारे लोक वाढत होते व ते माघार घ्यायला तयार नव्हते. बऱ्याच वाटाघाटी झाल्या अखेर पोलिसांनी गुपचूप आयुबचे प्रेत त्याच्या घरी पोचवले. पण आयुबच्या कुटुंबियांची मागणी कायम होती. आणि अखेर पोलिसांनी सर्व मागण्या मान्य केल्या. नवा प्रथम घटना अहवाल लिहिला गेला आणि खुनाचे ३०२ चे कलम लावून गोरक्षकांची नावे दाखल झाली. आणि कुटुंबियांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी आयुबचेदफन केले गेले. ज्या गोरक्षकांचे चेहरे सिसिटीव्हीने रेकॉर्ड केले होते त्याना अटक केले गेले पण त्यांना लगेच जामीन मिळाला व हायकोर्टाने त्यांना सोडले.

आम्हाला या प्रेमाच्या वारीत हे कुटुंब भेटले ज्यांनी ह्या गोरक्षकांना अभय देणाऱ्या व पिडीतांच्या विरोधात केस दाखल करणाऱ्या शासनाच्या एकतर्फी आणि कोणचीही शरम न बाळगता केल्या जाणाऱ्या कारवायांना शह देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. २००२ च्या गुजराथमधील नरसंहाराच्या वेळी

मानव हक्कांचे लढे देण्याचे धाडस दाखवले गेले, विशेषत: शासनाची संप्रदायी भूमिका असताना सुद्धा तसा पायंडा पाडला गेला आहे. आयुबच्या नंतर गोरक्षकांनी जीवे मारण्याच्या घटना त्या वर्षी तरी झाल्या नाहीत. आयुबचा  जीव घेणाऱ्यांच्या अटकेमुळे इतर तिरस्कारातून केल्या जाणाऱ्या जीवघेण्या हल्ल्यांवर चाप बसला  आहे. पण असा परिणाम वारीला इतर कोणत्याही राज्यांमध्ये झालेला दिसला नाही.

आयुबच्या खुनाची आणि गोरक्षकांची नावे प्रथम घटना अहवालात नोंद केल्यामुळे आयुबच्या आईला, त्याच्या विधवेला, भावाला व बहीणीला थोडेतरी समाधान मिळाले. पण वर्ष झाले तरी आयुबने सहन केलेल्या यातना व जीवाभावाचे माणसाचे जाणे ह्यातून ते सावरलेले नाहीत.

## दिवस १५ वा

आमच्या वारीच्या गुजराथमधील तिसऱ्या दिवशी ज्या ठिकाणी या वर्षाच्या च्या सुरवातीला सुनियोजित सांप्रदायिक दंगे झाले त्या ठिकाणी आम्ही गेलो. ह्या घटनेची  राष्ट्रीय पातळीवरच्याजाणीवांमध्ये किती नोंद घेतली गेली ह्या बद्दल शंकाच आहे. पण ह्या दंगलीत एकमृत्यू, आणि अनेकघायाळ, आणि १४० घरे भस्मसात झाली होती. आम्ही पाटण जिल्ह्यातील वडवली गावात गाडीने गेलो. आम्ही नसीम बेन ह्या इब्रहीमच्या विधवेला भेटलो. इब्रहिमचा त्या दंगलीत मृत्यू झाला होता.

अधिकृत दंग्याची गोष्ट म्हणजे दंगल दोन  धर्माच्या विद्यार्थी समूहात झालेल्या भांडणामुळे झाली.एक राजपूत मुलगा एका मुस्लीम विद्यार्थ्याच्या बाजूला १०वीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी बसला होता. राजपूत मुलगा कॉपी करतोय असे पर्यवेक्षण करणाऱ्या शिक्षकांच्या लक्षात आले. त्याला त्यांनी वर्गाच्या बाहेर काढले. राजापूत मुलाला खात्री होती की त्याच्या बाजूच्या मुस्लीम मुलानेच त्याची तक्रार केली होती. तो मुस्लीम मुलगा बाहेर आल्यावर राजपूत मुलगा त्याच्या अंगावर धावून गेला. एका वयस्क मुस्लीम माणासाने त्यांचे भांडण सोडवायचा प्रयत्न केला. पण रागावलेल्या राजपूत मुलाने त्या दोघांना मारले.

राजपूत मुलगा वडवली येथील आपल्या गावी गेला आणि १५ वयस्क राजपूत पुरुषांना घेऊन आला. त्यांनी त्या मुस्लीम मुलाबरोबर वाद घातला. मोठी माणसे मध्ये पडली  व त्यांनी सांगितले की गरम रक्ताच्या तरुणांच्या छोट्या छोट्या गोष्टी मोठ्या माणसांनी वाढू देऊ नयेत. नंतर राजपूत पुरुष निघून गेले.

काही तासानंतर एक २००० राजपुतांचा जमाव आसपासच्या गावातून जमा झाला. ते ट्रक्टर्स, मोटारी, , मोटारसायकलस, खंजीर, सळ्या व थोड्या रायफली  घेऊन आले होते. त्यांनी त्यांच्या बरोबर पेट्रोल व पांढरे रसायन देखील आणले होते. त्या रसायनामुळे सिमेंटच्या भिंती व छपरे पण जळतात. ते जाळत, लूटमार करत मुस्लीम वस्तीमध्ये दंगल  करू लागले. घाबरलेल्या बाया व मुले घर सोडून शेतात लपून बसली. पुरुष घरात व गच्चीत गेले.

नसीन बेन सांगत होत्या की त्यांचे कुटुंबीय घराच्या बाहेर बसले होते आणि हा पेटून उठलेला राजपूत जमाव अचानक आला. त्यांचा नवरा इब्राहीम हा रोजी कमावणारा मजूर. ह्या आरोळ्या ऐकल्यावर तो घाबरला व त्याने मागच्या दाराने मुले व बायकांना शेतात पाठवले. त्याचे मुलगे छपरावर जावून लपून बसले. इब्राहिमने घरात स्वत:ला बंद करून घेतले. जमाव त्याच्या घरापाशी आला व त्याचे नाव घेऊन हाका मारू लागला. त्यांनी घराचे दार तोडले. तो त्यांना एका कोपऱ्यात लपलेला दिसला. त्याला त्यांनी बाहेर खेचत आणले आणि तो ठार होईपर्यंत मारले. हे सर्व होत होते तेव्हा पोलीस फक्त बघ्याची भूमिका बजावत होते असा गावकरी दावा करत आहेत.

अधिकृत अहवालाप्रमाणे हा एक दोन जमातीतला उस्फुर्त दंगा होता. आणि त्याची सुरवात दोन धर्माच्या विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या भांडणातून झाली. पण हे पटत नाही की भांडण झाल्यानंतर दोन ते तीन तासात एवढा मोठा जमाव, तो देखील अनेक गावातून जमा कसा होऊ शकतो. तो जमाव एवढ्या मोठ्या प्रमाणात पेट्रोल आणि रसायने कशी काय जमा करू शकतो? हे पहाता असे वाटते की हा बनाव ठरलेला होता. आणि हा दोनमुलांमधला वाद हे फक्त निमित्त होते. त्यामुळे गावातील मुस्लिमांवर हल्ला करता आला.

मुस्लीम गावकऱ्यांना हेच वाटते. त्यांचे म्हणणे ह्या दंग्याच्या पाठीमागे अधिकृत कारणापेक्षा काहीतरी वेगळेच कारण आहे. पंचायत निवडणुका होऊ घातल्या आहेत. मुस्लीम आणि पटेल यांचे गावात प्रमाण चांगले आहे. पण ह्या दोघांचा एकेकट्याने जोर नाही आणि त्यांची एवढी पण मते नाहीत की त्यांचा सरपंच निवडून येईल. दोन्ही जमातीच्या मध्ये बोलणी होऊन असा निर्णय झाला की हात मिळवणी करायची आणि दोघांनी जबाबदारी वाटून घ्यायची. त्या प्रमाणे कार्यकालाच्या पहिल्या भागात मुस्लीम सरपंच असेल व पटेल सरपंच दुसऱ्या भागात असेल. मुस्लीम सरपंचाची निवड अविरोध झाली. कारण गावात त्यांची संख्या जास्त आहे हे माहित होते. राजपूत चिडले होते. कारण त्यांच्या गावाने अजून पर्यंत मुस्लीम सरपंच कधीच निवडला नव्हता. ह्या आवृत्ती प्रमाणे राजपुतांनी असे ठरवले होते कि मुस्लिमांना चांगला असा धडा शिकवायचा जो ते कधीच विसरणार नाहीत. ह्या कारणासाठी त्यांनी मुस्लीम महिला सरपंचाच्या नवऱ्याला जीवे मारायचा प्रयत्न केला. त्याला जांघेत गोळी लागली पण तो वाचला. म्हणून आता त्याचा खंदा सहाय्यक इब्राहीम याला मारले गेले.

पोलिसांनी अनपेक्षितरीत्या ही दुसरी आवृत्ती ग्राह्य धरली व राजपूत जमावाच्या विरोधात १२०अ हे फौजदारी कलम लावून गुन्हा दाखल केला. पूर्व नियोजित गुन्हा यासाठी ह्या कलमाचा उपयोग केला जातो. पण आम्ही ह्या वारीच्या काळात पाहीले की जवळजवळ प्रत्येक केसमध्ये पोलीस पिडीतांवरच फौजदारी गुन्हे दाखल करतात. व त्याचे स्वरूप हे फार गंभीर असते, म्हणजे की गंभीर रीत्या जखमी केले व अत्यंत धोकादायक हत्यारांचा वापर केला गेला इत्यादी. ह्या ठिकाणी देखील पोलिसांनी सगळ्या मुस्लिम नेत्यांच्या नावे गुन्हे दाखल केले. त्यामध्ये सरपंचाच्या नवऱ्यावर पण खोटा आळ घेतला आहे.

हे पण सर्व केसमध्ये आढळले कि त्या मृतव्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकांना भेटून त्यांचे सात्वन करायला, हालहवाल विचारायला एकही प्रशासकीय अधिकारी कधीही गेलेला दिसत नाही. किंवा बिगर मुस्लीम शेजारी देखील मदतीला धावलेले दिसत नाहीत.

आम्ही नंतर बसने आणंद जिल्हयातील काशोर ह्या गावी गेलो. येथे आम्हाला शैलेश मणिभाई हा दलित रोहित जमातीतला तरुण व त्याची आई मणीबेन भेटले. रोहित जातीचे काम हे मेलेल्या गुरांची कातडी सोलणे हे आहे. तो १० वी पर्यत शिकलेला आहे. शैलेशला तरीसुद्धा या अगदी सामाजिक दृष्ट्या खालच्या दर्जाच्या कामाशिवाय कोणचेही काम मिळाले नाही. त्याचे वडील १५ वर्षे अंथरुणात पडलेले आहेत. त्याच्या जातीच्या गलिच्छ कामाला तो लागला त्यामुळे त्याच्या कुटुंबीयांची तो पोटापाण्याची सोय तरी करू शकला. तो शेजारच्या गावातील काही त्याच्या रोहित जातीतील लोकांच्या बरोबर काम करतो. त्या रोहित बंधूंकडे ट्रॅक्टर आहे. कोणाच्याही घरी गाय किंवा म्हैस मेली तर ते लोक शैलेशला निरोप देतात. तो त्याच्या साथीदाराला बोलावतो व ते मेलेले जनावर ट्रॅक्टरने उचलून आणतात व ज्या ठिकाणी मेलेल्या जनावराचे उरलेले शरीर टाकता येते अशा गावातल्या ठरलेल्या जागेत ते धूड उचलून नेतात.

ऑगस्ट २०१७ला त्याच्या गावातील राजपुताने निरोप पाठवला कि त्याच्या घरी एक जनावर मेले आहे. शैलेशने ट्रॅक्टर आणला व त्या मेलेल्या गुराला उचलले. जास्त जोरात झालेल्या पावसाने नेहमी जनावरे सोलतात तो भाग पाण्याने दलदलीचा झाला होता. म्हणून शैलेश त्या जनावराचे धूड घेऊन दुसऱ्या जागी गेला. ही जमीन गावाच्या स्मशान भूमिजवळ होती. ह्या जमिनीवर जनावरे सोलली जाणार ह्याचा राग उच्चजातीच्या लोकांना आला. ते सरपंचाकडे गेले. शैलेश मेलेल्या गुराला घेऊन तेथे गेल्यामुळे ते स्मशान दूषित होईल असे त्यांचे म्हणणे. शैलेशने नेहमीची दलदलीची जमीन इथून पुढे वापरायची असे ठरले .

ह्या ठिकाणी प्रकरण मिटायला हवे होते. पण दुसऱ्या दिवशी सकाळी १५०रागावलेले राजपूत रोहीतांच्या आळीत गेले. आणि त्यांनी शैलेशला झोडपायला सुरावत केली. शैलेशच्या आईने अडवण्याचा प्रयत्न केला. तर तिला पण त्यांनी मारले . सगळा वेळ ते जातीवरून अपमान कारक बोलत होते. त्या मारहाणीमुळे शैलेशच्या आईला काही काळ इस्पितळात ठेवायला लागले.

आधीच्या पिढीने मार व अपमान हा त्यांच्या जातीचा भाग म्हणून आवाज न करता स्वीकारले असते. शैलेशने ते मुकाट्याने सहन केले नाही. तो पोलिसांकडे गेला व त्याच्यावर हल्ला करणाऱ्या उच्चवर्णीयांची रीतसर नावासकट केस नोंदवली. पोलिसांनी दलित व आदिवासीवर अत्याचाराच्या विरोधातील कलमे उच्च वर्णीयांना लावली. शैलेशने हे पण जाहीर केले कि यापुढे तो गावातील मेलेली गुरे उचलणार नाही.

उच्चवर्णीय लोकांना राग अनावर झाला की एक शुद्र आपल्या अधिकाराला अशापद्धतीने आव्हान कसे देऊशकतो. दलितांवर केलेल्या अत्याचाराचे कलम हे गंभीर आहे. जर गुन्हा सिद्ध झाला तर अनेक वर्षाची शिक्षा होऊ शकते. आणि आता त्यांना प्रदूषित करणाऱ्या मेलेल्या गुरांना स्वत: उचलावे लागणार होते ते निराळेच, गुरांसाठी खड्डे करायचे काम देखील करावे लागणार होते.

उच्चवर्णीयांनी एकमताने रोहीतजातीवर बहिष्कार घालायचे ठरवले. उच्चवर्णीय हे जमीनदार असल्यामुळे रोहित जातीचे काम ठप्प झाले. जातीवाचक शिव्या टाळण्यासाठी त्यांनी आपल्या मुलांना दूरच्या शाळेत घातले. ११ वर्षे फॅक्टरीतकाम करणाऱ्याएका कामगाराला त्याच्या उच्चवर्णीय अधिकाऱ्याने कामावरून काढून टाकले कारण तो शैलेशच्या गावचा आहे.'काय सांगावे, तूपण तुझ्या गाव वाल्याप्रमाणे उच्चवर्णीयावर जातीवरच्या अन्यायाची केस दाखलकरू शकतोस. .तू आमच्या

विरोधात कधी ही कायदा वापरू शकतोस' असे त्यांचे म्हणणे. . त्यानेदेखील लेबर कोर्टात केस केली आहे.त्याला कामावर काढून टाकल्याची केस तो कामगार लढत आहे.

आम्हाला असे आढळले की गावातल्या दलितांचे मनोधैर्यचांगले आहे. त्यांचा आत्मसन्मान वाढलेला आहे. त्यांनीउच्चवर्णीयांच्या समोर आपला आत्मसन्मान टिकवला आहे.जय भीम ते प्रत्येक ठिकाणी म्हणत होते. मी त्यांना सांगितले कि ते समानतेसाठी लढले म्हणजे ते आपल्या सर्वांसाठी आपल्या सर्वांच्या वतीने लढले.

## दिवस १६ वा

ह्या द्वेष व तिरास्कारातून घडणाऱ्या जमावाने केलेल्या अत्याचाराच्या विरोधात प्रेमाच्या वारीच्या ह्या टप्प्यातील हीशेवटची भेट होती. ही कारोला या पंचमहाल जिल्ह्यातील आदिवासी विभागात रहाणाऱ्यादलित स्त्री, दाहीबेनची होती. तिला बारा वर्षापासून डाकीण ठरवले गेले आहे. ती त्या विरोधात लढा दिलेली स्त्री आहे. तिने हे चिडवणे, त्रास देणे, छळणे याला तोंड दिले आहे.

आम्हाला ह्या वारीत जमावाने केलेले जीव घेणे हल्ले, दलितांवरचे अत्याचार, व शासनाने प्रोत्साहित केलेले सांप्रदायिक उद्देशाने केले हल्लेअशाने पीडित कुटुंबियांना भेटणे अपेक्षित होते. पण प्रथम राजस्थान येथील तसेच नंतर गुजराथ मध्ये आमच्या नारीवादी यजमान स्त्रियांनी सांगितले की धार्मिक अल्पसंख्याक, दलित, आदिवासी,यांबरोबरच स्त्रिया विशेषत: एकट्या असणाऱ्या स्त्रिया यांना मध्ययुगीन अत्याचार सहन करावे लागतात व त्यांच्यावर चेटकीण म्हणून ठप्पा बसू शकतो.

दाहीबेनचा नवरा अचानक वारला तेव्हा तीफक्त ३० वर्षाची होती. व दोन मुले पदरात होती. नवऱ्याला आधी कधी कोणताही आजार झालेला नव्हता आणि त्याचा मृत्यु हा अचानक व ताबडतोब झाला. ती सांगत होती त्या वर्णनावरून असे वाटत होते की तो निश्चितच हृद्यविकाराचा झटका असावा, पण नवऱ्याच्या मोठ्या भावाला वाटत होते कि दाहीबेन ही डाकिण किंवा चेटकीण आहे. आणि तिने आपल्या नवऱ्याचा मृत्यू घडवून आणला. तेव्हापासून काही वाईट झाले,म्हणजे आजारपण किंवा कुटुंबात झालेले मृत्यू किंवा दूर बंगलोरला असलेल्या तिच्या भाच्याचे आजारपण सगळे तिच्या चेटकीण असण्यामुळे होत होते असे म्हणून तिलाच दोषी धरले जात होते. .

तिचा नवरा जनावरांच्या इस्पितळात सफाई कामगार म्हणून अर्धवेळ काम करतहोता. तो वारल्यावर त्याची नोकरी तिला मिळाली. पगार ३५० रुपये होता. पण तिला ती नोकरी मौल्यवान होती कारण मुलांना वाढवायचे होते.

पण तिचा दीर तिला सतत छळत असे व ती जाईल तेथे ती चेटकीण आहे असे म्हणून तो तिच्यावर ठप्पा ठेवायचा. तो बरेच वेळा तिच्या कामाच्या ठिकाणी जात असे व तिला शिव्या देत असे. ती एकटी असेल तेव्हा तिच्यावर लैंगिक बळजबरी करायचाही प्रयत्न त्याने केला. त्याच्या बायकोला पक्षाघात झाला तो पण तिच्यामुळे झाला असे तो म्हणत असे.त्याने तिचे भूत उतरवण्यासाठी अनेक जाहीर कार्यक्रम केले. तो तिच्या घरापर्यंत तिचा पाठलाग करायचा. तिच्या नवऱ्याने बांधलेले छोटेसे

मातीचे घर होते. ते तिच्या नवऱ्याच्या समाइक शेतीतच होते. त्या दिराने म्हणले की तू जागा सोड, कारण तू तुझ्या नवऱ्याच्या कुटुंबाला चेटूक करून नाहीसे करते आहेस. तिने त्याला म्हटले जर मी चेटकीण आहे तर मी तुला का नाही मारले? ती म्हणाली माझ्या नवऱ्याने बांधलेले घर मी कधीच सोडणार नाही. व जमिनीचा वाटा मी माझ्या मुलांसाठी राखेन. मग काहीही होऊ दे.

एक दिवस त्याने कामाला जाताना तिला अडवले. तो ओरडत होता की ही चेटूक करते. हिला नाहीसे करायला हवे. त्याने तिच्यावर हल्ला केला. त्याने तीन वेळा तिच्या डोक्यावर हॉकीच्या काठीने मारले ती जमिनीवर कोसळली. तिला डोक्याला मार लागला व खूप रक्त वाहिले. आणि ती जखमी झाली. एका दुकानदाराने रुग्णवाहिका बोलवली. तिला२० दिवस इस्पितळात ठेवावे लागले. तिच्या डोक्यावर२४ टाके पडले. ती बरी झाली पण वेदना खूप होत्या. तिच्या मोठ्या मुलाने शाळा सोडली व तिला त्याच्या नजरेसमोरून हलायला परवानगी द्यायची नाही असे त्याने ठरवले आहे. त्याने दोघांसाठी काम हुडकले. सहकारी तत्वावर दुधाच्यासाठी बॉक्स बनवायच्या होत्या. त्याने हे केले कारण कामाला ती एकटी कुठे जाऊ शकणार नव्हती. आता ते दोघे कामावर बरोबर जातात व एकत्र परत येतात..

आनंदी ही आदिवासी व स्त्रियांच्या हक्कासाठी लढणारी व चेटकीण ठरवल्या गेलेल्या स्त्रियांच्या मदतीसाठी काम करणारी संस्था आहे. त्यांच्या मदतीने स्त्रिया त्यांच्या वर हल्ला करणाऱ्यांच्या विरोधात पोलिसात त्यांची केस नोंदवू शकतात. पण दिराला फक्त एक दिवस अटक झाली. व त्याला जामीन मिळाला. तो पटवारी होता व त्याला गावात बरेच महत्त्व होते.

त्याला काडीचाही पश्चाताप नाही. कदाचित त्याची खात्रीच आहे की त्याच्यावर वारंवार येणारे दुर्दैवाचे आघात हे चेटुक केल्याने होत आहेत. किंवा आपल्या भावाच्या विधवेला घालवून त्यांची समाईक जमीन आपल्याला परत मिळेल असे त्याला वाटत असेल. काही कारण असेल पण तो तिचा पाठलाग करत राहिला. तो तिचा सार्वजनिक ठिकाणी अपमान करायचा. तो तिला सांगत राहिला कि तिने घर सोडावे. जमीन सोडावी आणि ह्यावेळी त्याने तिला धमकी दिली होती कि तो तिचा खून करेल. पण तिला आता दोन मुलगे आहेत. ते तिचे संरक्षण करण्यात सक्षम आहेत. तिच्यासाठी स्थानिक पातळीवर अनेक मिटिंग घेतल्या व तिला आता स्थानिक मदत मिळाली आहे. आम्हाला या वारीत एवढ्या मोठ्या प्रमाणात स्थानिक सहाय्य इतरत्र कुठेच मिळालेले दिसले नाही.

आज वारीच्या ह्या दुसऱ्या टप्प्यातील शेवटचा दिवस. आम्ही रात्री उशिरा गोध्र्यात पोचलो. गोध्राच्या गांधी आश्रमात मिटिंग झाली. ही मिटिंग दोन कारणांसाठी महत्वाची होती. पहिले कारण म्हणजे गोध्रा स्टेशनवर गाडीचा डब्बा जळला होता व त्या आगीपासून गेल्या १५ वर्षापासून एक द्वेषाचे तिरस्काराचे एक चक्र सुरु झाले आहे ते आजतागायत चालू आहे. दुसरे कारण गोध्रा येथील गांधी आश्रमाला १०० वर्षे पूर्ण झाली. हा आश्रम १९१७ साली महात्मा गांधीनी स्थापला व ते बऱ्याच वेळा या ठिकाणी प्रार्थना सभा घेत असत. ह्या सभांमध्ये शांती, विविध धार्मिक निष्ठा असलेल्या समुदायांमध्ये आपापसात शांती नांदावी तसेच अस्पृशता दूर व्हावी यासाठी १०० वर्षापूर्वी केलेल्या प्रार्थनेचेस्मरण आम्ही केले.

अनेक लोक आज गांधीजीना मानत नाहीत कारण त्यांचा अस्पृश्यतेला विरोध होता पण जाती प्रथेला नव्हता. आज मी पूर्णत: आंबेडकरांच्या विचाराशी सहमत आहे. अस्पृश्यता केवळ एक चूक नाही तर ती जातीव्यवस्थेचा हिस्सा आहे. सामाजिकसमानता व बंधुत्व या फक्त सुधारणेने होणा-या गोष्ट

नाहीत, त्यासाठी जाती प्रथा नष्ट होणेच गरजेचे आहे. असे असले तरी मी महात्मा गांधीवर प्रेम करतो व त्यांच्या बद्दल मला आदर आहे कारण गांधी हे अत्यंत धीराचे लढवय्ये होते व त्यांनी भारताचा पाया हा प्रेम व परस्पर आदरभाव व चांगुलपणा ह्यांवर असावा यासाठी लढा दिला. गांधीनी जे त्यांच्या शेवटच्या महिन्यांमध्ये केले तेच आपले उद्दिष्ट आहे. त्याची आठवण ह्या प्रवासात वारंवार होत होती. लाखो लोक हिंदू-मुस्लीम दंगलीत मारले गेले आहेत. देश द्वेषाने दोन छकले झालेला आहे. दोन्ही बाजूने येणा-या जाणा-या गाडीतील माणसेदोन्ही बाजूनी मारली गेली आहेत आणि लाखो निर्वासित पाकिस्तानातून येत आहेत. भयानक सांप्रदायिक दंगलीमुळे रक्ताचे पाट वाहत आहेत. ह्या सर्वश्वर्भूमीवर गांधीची सर्व धर्म समभावावरची न हरवलेली निष्ठा आणि प्रेम आणि एकता व समान नागरिकत्व हीच खरी भारत या देशाची कायदेशीर बैठक आहे याबद्दलचा त्यांचा विश्वास अतुलनीय आहे..

ते एकटेच चालत होते ज्या ठिकाणी द्वेषाची परिसीमा होती. नौखाली सारख्या ठिकाणी, आणि दिल्ली या राजधानीत. द्वेषाने वातावरण भरलेले होते. त्या प्रेमाच्या मुलभूत कल्पनेला या प्रेमाच्या वारीचे विनम्र अभिवादन. म्हणूनच आम्हाला त्यातून प्रेरणा पण मिळाली व आम्ही काहीशा शांत चित्ताने त्यांच्या आश्रमाच्या ह्या हॉलमध्ये बसू शकलो. आम्ही त्यांच्या निर्भय धाडसाला,त्यांच्या प्रेमाला वंदन करतो. त्यांच्यानंतर बरोबर १०० वर्षांनी हे शहर द्वेषाच्या राजकारणाचे मुख्य केंद्र बनले आहे.

या प्रेमाच्या वारीत आम्ही आसुसलेपणाने घोषणा देतो. ‘जयभीम!’ पण त्यानंतर ‘जय गांधी’ ही घोषणाही द्यायला हवी. ह्या दोन्ही नेत्यांच्या वाटांमध्ये आम्हाला सर्व लोकांमध्ये प्रेम, बंधू भाव व भगिनी भाव असावा ही एकच भावना दिसते. ‘जय भीम’‘जय गांधी’.

## वारी चालूच राहील

वारी प्रेमाची नागाव या आसाम राज्यातील गावातून ४ सप्टेंबर २०१७ला ला निघाली व ती २ ऑक्टोबर २०१७ ला गुजराथमधील पोरबंदर या गावी समाप्त झाली. हे गाव महात्मा गांधीचे जन्मगाव. हा दिवस म्हणजे त्यांची जयंती. १४८ वर्षा पूर्वी या गावात त्यांचा जन्म झाला होता.

या प्रवासात या प्रेमाच्या वारीने एवढे गंभीर व दीर्घकाळ सहन करावे लागणारे दु:ख पाहिले, द्वेषातून, दुस्वासातून केलेले अत्याचार व हिंसा पाहिली आणि सर्वात दुर्बल नागरिकांच्या प्रती असलेली शासनाची फार मोठ्या प्रमाणातील आकसाची भावना पाहिली की हे सारे अनुभवल्यामुळे ही प्रेमाची वारी अशीच चालू राहावी असा निर्णय आम्ही घेतला आहे.

**हा प्रवास, ही वारी ही फक्त एक कल्पना म्हणून न राहता खरोखरच वास्तवात सुरु रहायला हवी.**

ह्या प्रेमाच्या वारीतील प्रवासात वारीतील सदस्य वेगळ्या वेगळ्या प्रकारचे कार्यक्रम व उपक्रम हाती घेतील. आज संघटना व गटांचे अनेक प्रकारचे प्रयत्न चालू आहेत.त्यांची पुनरावृत्ती करण्याचा वारीचा अजिबात मानस नाही. आम्हाला या प्रयत्नाना हातभार लावायला आवडेल तसेच त्यांचे सामर्थ्य

वाढवायला आवडेल. त्यांच्या काही त्रुटी किंवा कमतरता असतील तर त्या भरुन काढण्याचा आम्ही प्रयत्न करू. आणि ह्या उपक्रमांना दुजोरा मिळेल असेच कार्यक्रम हाती घेऊ.

आम्ही द्वेष व दुस्वासातून झालेल्या हिंसेला बळी पडलेल्या पीडितांच्या बरोबर राहू व त्यांचे मनोधैर्य वाढवायच्या प्रयत्नात आमचा हा प्रवास कायम चालू राहील.

**द्वेषातून घडलेल्या गुन्ह्यांच्या बळींना पाठिंबा देण्यासाठी ही वारी चालूच राहील**

आम्ही ज्या महिन्यात ही वारी करत होतो त्या महिन्यातच आणखी काही बातम्या आल्या. एका दलित मुलाला गरबा पहात होता म्हणून जमावाने मारले, तर दोघांनी दाढी ठेवली म्हणून त्यांना मारहाण झाली, एका स्त्रीला चेटकीण ठरवून तिचा जीव घेण्यात आला. मुस्लीम तरुणांना मारहाण करण्याचे पोलिसांचे सत्र चालूच होते. गाईच्या नावाखाली जमावाने हल्ले करण्याच्या घटना पण घडत होत्या. `आम्ही या भारतातील जनता' एकत्र येऊन या घटनांचा शेवट करत नाही तोपर्यंत ही वारी थांबू शकत नाही. आम्ही असे निश्चित ठरवले आहे की आमच्या पैकी काहीजण तरी एखाद्या राज्यात जाऊ व अशा पिडीत कुटुंबियांची भेट घेऊ.

**भारतातील वाढत्या अंधाराच्या कालखंडाची नोंद करणे**

वाढत्या द्वेषाच्या आणि भयाच्या घटना ज्या आम्ही प्रत्यक्ष या वारीत अनुभवल्या त्या कालखंडाचा दस्तेवज बनवणे. हे काम पुस्तके, चित्रफीत, फोटो प्रदर्शने आणि जाहीर भाषण या साऱ्या माध्यमांतून प्रेमाच्या वारीतील आम्ही सदस्य करत राहू. वारीच्या प्रवासातील प्रत्येक महिन्यात हे होत राहील. अनेक वारकर्यांानी अनुभवलेल्या, ऐकलेल्या व पाहिलेल्यागोष्टी सांगायला सुरवात केली आहे. त्यांचेमानस हे चालू ठेवण्याचा आहे. ह्या पाठीमागचा उद्देश हा आहे की आपल्या देशातील भावा-बहिणींना असा संदेश द्यावा की एकमेकांची काळजी घ्या, बोलते व्हा व प्रतिकार करा. आम्हाला वाटते की ही माहिती देऊन लोकांतील सदसदविवेक बुद्धी जागवण्यासाठी मदत होईल. तिला जागे करण्याचा हा आमचा मानस आहे तसेच त्यांना हे आवाहनही आहे.

**द्वेषातूनहोणाऱ्या अत्याचारांची नोंद ठेवण्याच्या नागरिकांच्याप्रयत्नांना सहाय्य करणे**

या वारीत असे लक्षात आले की द्वेषातून हजारो प्रकारचे अत्याचार होत आहेत. त्यापैकी फार थोडे स्थानिक पेपरमध्ये नोंद केले जातात. ह्यातीलही अगदी थोडे राष्ट्रीय पातळीवर प्रकाशित होतात. त्यातले मोहम्मद अखलक, पहेलू खान, हाफिज जुनेद यासारखे अत्यंत मोजकेच राष्ट्रीय पातळीवर लोकांच्या भावनेला , विचारालाहात घालतात. आपण हे पण पाहिले पोलीस यापैकी बहुतेक घटनांचा रस्त्यावरील अपघात, गोमांस बंदी वा पोलिसांचा स्वसंरक्षणासाठी केलेला गोळीबार अशा स्वरूपात त्याची नोंद करतात. ज्या मुस्लीमांवर अत्याचार होतात त्यापैकी काहीजणअशा हिंसाचाराच्या घटना पोलिसांकडे नोंदवायला जात नाहीत. कारण त्यांच्यावर अत्याचार व हल्ले झाले ते गुरे वाहून नेताना झाले असे सांगितल्यावर पोलीस त्यांच्यावरच खटले घालतील आणि हल्ला करणार-या  जमावातील माणसे मात्र बाजूला रहातील.

सत्ताधारी शासन, रास्वसंघाचे लोक आणि त्यांचे हितचिंतक हे सतत म्हणत आहेत की असे हल्ले फारच तुरळक आणि आकडेशास्त्राच्या प्रमाणे फारच क्षुल्लक आहेत. मुख्य प्रवाहातील माध्यमे, काही

प्रशंसात्मक अपवाद सोडल्यास, ही अधिकृत पातळीवर ह्या अत्याचारांची क्रूरता व त्याचे गांभीर्य कमी करण्याचे जे संगनमत आहे त्याचीच कास धरतात.

हिंदुस्थान टाईम्स,इंडिया स्पेंड, सिटीझम्स अगेन्स्ट हेट, सिटीझन फॉर जस्टीस, पियुडीआर व एनसिडीएचआर या संस्थांनी महत्वाचे प्रयत्न करून ह्या द्वेषाच्या गुन्ह्यांचा पाठपुरावा केला आहे. ह्या वारीतील वारकरी या प्रयत्नाना पूर्णपणे पाठिंबा देतात व गरज असेल तर ह्या अत्याचाराच्या घटनांची खात्री करून घेणे, घटनांचा पाठपुरावा करून त्यांचे दस्तेवज करणे हे सारे करण्यासाठी लागणारी स्वयंसेवकांची टीम प्रत्येक राज्यासाठी वारकर्यांरच्या सहयोगाने बनू शकेल. ह्या मध्ये विद्यार्थी, वकील, वार्ताहार, अभ्यासक, आणि कार्यकर्ते सहभागी होतील.

**पिडीतांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी सुरक्षा व संरक्षण जाळे उभारणे**

हिंसा ग्रस्त पिडीतांच्या कुटुंबियांसाठी सहाय्य करण्याची नैतिक जाबाबदारी वारक-यानीस्वीकारलेली आहे. अहिंसा, मानव हक्क व मानवता या तत्वांनी काम करणाऱ्या धार्मिक आणि निधर्मी गट व संस्थांनी अशा काही कुटुंबांना मदतीचा हात दिलेला आहे. वारीचे कार्यकर्ते जेथे कोणी पोचले नाही अशा ठिकाणांना प्राधान्य देतील. अशा कुटुंबियांच्या चार प्रकारच्या गरजा असतात. एक म्हणजे न्यायासाठी कायद्याशी निगडीत समस्या, दुसरी गरज ही सामाजिक व मानसिकरीत्या होणाऱ्यायातना व वेदनांसाठी उतारा मिळेल अशी स्वास्थ्याची काळजी, तिसरे म्हणजे त्यांच्या आर्थिक समस्या व त्यांचे अधिकार म्हणजे सरकार कडून घ्यावयाची नुकासानभरपाई, पेन्शन, आणि आरोग्य सेवा यांचा पाठपुरावा. चौथी मदत ही, घरातील कर्ता करविता अचानक जाण्याने व अन्य स्त्रोत नाहीसे झाल्यामुळे, भीतीमुळेइत्यादी कारणाने गमावलेला जीवनाधार पुन्हा उभारणे. ह्या चारही प्रकाराच्या मदतीसाठी त्या समाजातून दोन स्वयंसेवक प्रत्येक कुटुंबाला मिळावेत असे प्रयत्न आम्ही करत आहोत. हे स्वयंसेवक कायद्याची मुलभूत सूत्रे, आर्थिक हक्क, आणि मानसिक सामाजिक गरजा याबाबतचे समुपदेशन व सहाय्य करण्याचे काम करतील. आशा आहे की हे आम्ही करू शकू.

**अमन इन्सानियात समिती आणि मानव हक्कासाठी आघाडी यांना सहाय्य करणे**

ज्या शासनाने पिडीतांबद्दल आकसाचे व हल्लेखोरांचा बचाव करण्याचे धोरण स्वीकारले आहे अशा शासनाकडून संरक्षण मिळणे यासाठी जास्त पद्धतशीर प्रयत्नांची गरज आहे. या दृष्टीकोनातून पाहिले असता कायदेशीर न्याय मिळण्यासाठी मानवी हक्कासाठीचे एक संघटन वा गट हे मदत कार्य करू शकेल.विशेषत: अशा राज्यात ज्या ठिकाणी द्वेषातून होणाऱ्या अत्याचारांचे पेव फुटले आहे अशा ठिकाणी त्याची जास्त गरज आहे.आज असे खूप सारे प्रयत्न केले जात आहेत व काही संस्था सध्या हे काम करत आहेत. ह्युमन राइअट्स लॉ नेटवर्क, सिटीझन्सस अगेन्स्ट हेट, सिटीझन्स फॉर जस्टीस, पीयूसीएल, पियुडीआर व एनसिडीएचआर आणि काही मुस्लीम व ख्रिश्चन धार्मिक संघटना याबाबत महत्वाचे काम करत आहेत. त्यांच्या बरोबरीने काम केल्याने आपण एकमेकांची ताकद वाढवू, आणि मुख्य म्हणजे एकही कुटुंब मदतीशिवाय रहाणार नाही ह्याची आपण काळजी घेऊ शकू.

ह्यासाठी आणखी एक प्रयत्न आधीपासून चालू आहे. तो म्हणजे अमन इन्सानियत नागरी परिषद ही बहुसंख्य जिल्ह्यात देशभर उभी राहावी असा प्रयत्न चालू आहे. ह्या परिषदेत असे स्त्री-पुरुष, ज्यांच्या नैतिक आणि आर्थिक व्यवहारातील सचोटी बद्दल खात्री आहे आणि जे समाजिक आणि आर्थिक

समानता, सर्वधर्म समभाव, जात आणि लिंग यामधील समानता, कामगाराचे हक्क व विचार व वैद्यानिक दृष्टीकोन ही भारतीय घटनेने दिलेली मूल्य मानतात अशांचा समावेश असेल. तेद्वेषातून घडलेल्या घटनेचे वृत्त कानावर आले वा तशा प्रकारची घटना घडणार असे चिन्ह दिसल्यास व तशा प्रकारच्या धमक्या आल्या असल्यास अशा घटना घडू नयेत म्हणून ताबडतोबीनेकृती करतील. अशा दंग्यांना निमित्त होणाऱ्या अफवा थांबवण्याचा प्रयत्न करतील. अशा घटना समजल्या वरत्यातून हल्ले होतील अशी शक्यता दिसल्यास, सरकार, पोलीस यांना कृती करण्यास उद्युक्त करतीलव असे हल्ले टाळण्यासाठी प्रयत्न करतील. माध्यमांच्या सहाय्याने अशा अफवा खोट्या आहेत हे जास्तीत जास्त लोकांपर्यत पोचवतील. जर अशा प्रकारच्या हिंसा वा अत्याचाराच्या घटना घडल्या तर त्यांचेबद्दल सत्य घटना वृत्त प्रसृत करतील, मदत, न्याय्य नुकासानभारपाई, आणि ताबडतोबीचे सहाय्य व जरुर असेल तेथे पुनर्वसन, शांतता प्रस्थापित करणे, व कायदेशीर न्याय मिळवण्यासाठी पाउले उचलणे यासाठी काम करतील. हे स्त्री-पुरुष हे धार्मिक समुदायांमध्ये शांतताता नांदावी या साठी प्रयत्नशील असतील. जात व लिंग यामधील असमानता नष्ट व्हावी या साठी प्रयत्नशील असतील. या साठी ते शैक्षणिक संस्थांच्या बरोबर काम करतील. युवा व स्त्री संघटनांच्या सोबत काम करतील.कामगार संघटनाच्या बरोबर काम करतील. स्थानिक मंडळे व इतर समाजिक संस्थांमध्ये समानतेचे तत्व रुजवण्याचे त्यांचे उद्दिष्ट असेल.

**वारीचा प्रवास चालूच राहील**

आपल्या देशात द्वेष,, भीती, तुच्छता याच्या राजकारणाचे भूत आपल्या पाठी लागले आहे. ह्या भुताला अटकाव करायला हवा. प्रतिकार करायला हवा. आपल्या देशात सहानुभूतीची व घटनेने दिलेल्या लोकशाही मुल्यांची बूज राखायला हवी. या प्रेमाच्या वारीचा हा असा एक प्रयत्न आहे. हा प्रेमाचा प्रवास हा भारताच्या अंतर्गत अशांत  प्रदेशात तर घडायलाच हवाच पण तो आपल्या हृदयात आणि मनात दाटणारा अंधार दूर होण्यासाठी सुध्दा घडायला हवा.